नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३०९ * * भंडारा * मंगळवार, दिनांक ६ मे २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## युद्ध झाले तर पाकिस्तानचा नाश अटळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी जमियत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना अर्शद मदनी म्हणाले की, दोन्ही देशांमध्ये युद्ध होणार नाही अशी आशा आहे. त्यांच्या विधानावर शिवसेना नेते संजय निरुपम यांनी प्रतिक्रिया दिली आहे.
संजय निरुपम म्हणाले, भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध होऊ नये, हेच पाकिस्तानातील लोक, भारतात राहणारे जिहादी दंगलखोर मुस्लिम किंवा विरोधी पक्षाच्या नेत्यांची इच्छा आहे. अशरद मदनीच्या भावना भारतापेक्षा पाकिस्तानशी अधिक जोडल्या गेल्या आहेत. त्यांना माहित आहे की जर युद्ध झाले तर भारत पाकिस्तानचा नाश करेल.

अग्राग्रलेख

खरीखरी...

## कुठून झक मारली...

शंभर दिवसापूर्वी अमेरिकेचे राष्ट्रपती झालेल्या ट्रम्प यांनी या शंभर दिवसात अनेक पराक्रम केलेले आहेत. त्यामुळे लवकरच ट्रम्पची शंभरी भरतेय की काय, अशी शंका आम्हाला येऊ लागलेली आहे. एखादा माणूस जेव्हा वेडेवाकडे चाळे करतो. तेव्हा त्याला वेड्याच्या इस्पितळात दाखल केले जाते. जगात बलाढ्य अशा अमेरिकेचा अध्यक्ष विचार न करता नवीन नवीन फमार्ने काढतो आणि मग हीच फमार्ने आपल्या उरावर बसतील. असे दिसताच त्यातून पळ काढतो. अशी कितीतरी उदाहरणे या 100 दिवसात आपण बघितली. या ट्रम्प महाशयांनी चीनला ब?याच धमक्या दिल्या. मात्र त्यांच्या अशा प्रकारच्या पोरखेळाचा अंदाज आधीच चीनला आला होता. त्यामुळेच चीनने आधीच अमेरिकेबरोबरचा व्यापार हळूहळू कमी करण्यास सुरुवात केलेली होती. जे इतर कोणाला जमले नाही. ते चीनने आधीच केले होते. चीन आणि अमेरिका यांच्या लढाईत आज चीन अमेरिकेच्या दादागिरीला जराही जुमानेनसा झालेला आहे. ट्रम्प यांना कर्जबाजारी असलेल्या अमेरिकेला कोणत्याही प्रकारे आर्थिक दृष्ट्या मजबूत करायचे आहे. ट्रम्प यांचा हा प्रयत्न चांगला नाही, असे आम्ही अजिबात म्हणत नाही. पण हडेलहप्पी करून एखाद्या पट्टीच्या दारुड्याला एकदम दारू पिणे बंद कर, असे जर सांगितले तर त्याचे जे हाल होतात. तसेच आज अमेरिकेचे झालेले आहेत. ट्रम्प महाशयांना ज्या ज्या वस्तू बाहेरून आयात होतात. त्या सर्व अमेरिकेत तयार करावयाच्या आहेत. आताच्या घडीला अमेरिकेतील बडेबडे उद्योग अमेरिकेच्या बाहेर गेलेले आहेत. अमेरिकेतील महागाईमुळे या उद्योगांचा उत्पादन खर्च वाढत आहे. उत्पादन निर्मिती मूल्य वाढल्याने तेच उत्पादन महागडे ठरत आहे. त्यातच ट्रम्प यांनी अमेरिकेत बंद असलेले उद्योग सुरू करण्याचे ठरविलेले आहे. कितीही प्रयत्न केला तरी त्याला किमान अजून एक ते दीड वर्ष लागेलच लागेल. इतके असून सुद्धा कोणताही उद्योगपती ट्रम्प महाशयांच्या लहरीनुसार कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक करून एखादा उद्योग उभा करेल. असे अजिबात वाटत नाही. जरी एखाद्या धाडसी उद्योगपतीने एखादा उद्योग उभा केला आणि उद्या ट्रम्प यांची लहर फिरली. तर आलेल्या कहरात त्या उद्योगाचे पार बारा वाजू शकतात. ट्रम्प महाशय आज काय बोलले. उद्या काय बोलले आणि आज जे बोलले?. त्या उलट परवा काय बोलतील. याची कोणालाही कशाचीही कसलीच शाश्वती नाही. त्यामुळे अमेरिकेतील उद्योग व्यवसाय सोडाच. इतर अनेक बाबींवर उलटसुलट परिणाम होत आहेत. ट्रम्प यांचे वागणे, ट्रम्प यांचे बोलणे. एखाद्याला ट्रम्प यांनी एखाद्याला प्रेमाने मिरवणे आणि एखाद्याला भिरकावणे. हे आता अमेरिकेच्या जनतेला परिपूर्ण कळून चुकलेले आहे. त्यामुळे चार महिन्यांपूर्वी पन्नास टक्क्यांच्या वर असलेली ट्रम्प यांची लोकप्रियता, त्यांच्या अशा अस्थिर वृत्तीमुळे आणि लहरी बुद्धीमुळे बरीच खाली घसरलेली आहे. दोन्ही वेळेला ट्रम्प यांच्याविरुद्ध महिला उमेदवार उभ्या होत्या. हिलरी क्लिंटन आणि कमला हॅरीस या दोन्ही महिलांच्याविरुद्ध ट्रम्प यांना विजय मिळाला होता?. आता अमेरिकेतील ट्रम्प यांची घसरलेली लोकप्रियता अशीच घसरत राहिली. तर पुढे रिपब्लिकन पक्षाचे कसे होईल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अमेरिकेत कुणालाही दोन वेळा म्हणजेच आठ वर्षांपेक्षा जास्त वेळ राष्ट्रपतीपदावर राहता येत नाही. त्यात बदल करण्याचा ट्रम्प यांचा इरादा आहे. पण अमेरिकेतील लोकशाही इतकी परिपक्व आहे की, ट्रम्प यांच्या या प्रयत्नाला यश मिळेल. असे जगात कुणालाही वाटत नाही. अजून तीन वर्ष सात महिने आणि काही दिवस अमेरिकन जनतेला ट्रम्प यांना झेलायचेच आहे. तोपर्यंत ट्रम्प यांना जे पेलायचे आहे. ते ट्रम्प आपल्या परीने पेलतीलच. अमेरिकन जनतेला नियमाप्रमाणे बाकी काही फारसे करता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये सध्या अमेरिकन जनता म्हणत असेल. कुठून झक मारली आणि यांना निवडून दिले. पण आता उपयोग काय. कारण, बुंद से गई वो, हौद से नही आती!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# बारावीत मुलींचाच डंका

## ९१.८८% विद्यार्थी उत्तीर्ण : कोकण अव्वल : लातूरचा सर्वात कमी निकाल



| विभागनिहाय निकाल |
| --- |
| पुणे : 91.32% |
| नागपूर : 90.52% |
| संभाजीनगर : 92.24% |
| मुंबई : 92.93% |
| कोल्हापूर : 93.64% |
| अमरावती : 91.43% |
| नाशिक : 91.31% |
| लातूर : 89.46% |
| कोकण : 96.74% |

इ.१२ वी परीक्षेस नोंदणी केलेल्या पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रचलित पध्दतीने सवलतीचे गुण देणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (९६.७४%). सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा (८९.४६ %) आहे.
एचएससी बोर्डाने फेब्रुवारी-मार्च 2025 मध्ये घेतलेल्या बारावी परीक्षेचा निकाल आज ऑनलाईन जाहीर झाला आहे. यंदा तब्बल 91.88% विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारली आहे. मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी सांगितले की, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या 9 विभागीय मंडळांमार्फत झालेल्या या परीक्षेचा निकाल विषयनिहाय गुणांसह 9 विविध संकेतस्थळांवर उपलब्ध झाला.
यंदा राज्यात बारावी परीक्षा निकाल 91.88%टक्के लागला आहे. फेब्रुवारी-मार्च 2024 चा निकाल 93.37 टक्के होता. फेब्रुवारी-मार्च 2024 च्या तुलनेत फेब्रुवारी-मार्च 2025 चा निकाल 1.49 टक्केने कमी आहे.
परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपद्धतीनुसार दुपारी 1 वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात आला, अशी माहिती राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावर्षी एकूण 91.88%विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कोकण विभागाने सर्वाधिक 97.99% निकालासह अव्वल स्थान पटकावले. मुलींनी यंदाही मुलांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याचे ते म्हणाले.
या परीक्षेत नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम व आय.टी.आय. या शाखांसाठी एकूण १४,२७,०८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,१७,९६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून त्यापैकी १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व उत्तीर्णतेची टक्केवारी ९१.८८ आहे.
खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३६,१३३ एवढी असून त्यापैकी ३५,६९७ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून २९,८९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८३.७३ आहे.
या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ४२,३८८ पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४२,०२४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी १५,८२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ३७.६५ आहे.
या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ७,३१० दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७,२५८ दिव्यांग विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी ६,७०५ दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.३८ आहे.

## एसआयटी चौकशीच्या दिशेने कार्यवाही सुरू

### शिक्षण विभागातील घोटाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
नागपूर जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस नियुक्त्या, नियमबाह्य मान्यता, शालार्थ आयडी घोटाळा अशा गंभीर प्रकरणांची व्याप्ती आणि गांभीर्य लक्षात घेता, विधान परिषदेचे सदस्य आमदार संदीप जोशी यांनी यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विशेष तपास पथक (एसआयटी) गठित करण्याची मागणी केली होती. या मागणीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी ह्तपासून कार्यवाही करावीह्व अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.
यानुसार शिक्षण विभागातील तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित प्रकरणांची चौकशी सहसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत करून तातडीने शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना शिक्षण आयुक्त (महाराष्ट्र राज्य, पुणे) यांना देण्यात आल्या आहेत.
दरम्यान, नागपूर जिल्ह्यात बोगस नियुक्ती प्रकरणाचा मोठा भंडाफोड झाला असून विविध वृत्तपत्रे व टीव्ही चॅनल्सवर यासंदभार्तील बातम्या प्रसिद्ध होत आहेत. याप्रकरणी नागपूर येथील एका पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदविण्यात आला असून तपासादरम्यान शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांच्यासह इतर तीन अधिकारी/कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान या अधिकाऱ्यांकडून गंभीर स्वरूपाची माहिती समोर येत असून नागपूरसह राज्याच्या इतर भागातूनही बोगस नियुक्त्या व शालार्थ आयडी घोटाळ्यांबाबत तक्रारी समोर येत आहेत.
या प्रकरणातील शाळा चालक व शिक्षण विभागातील काही अधिकारी/कर्मचाऱ्यांनी शिक्षण क्षेत्राला भ्रष्टाचाराचे कुरण बनवून शासन, शिक्षक व पालकांची फसवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे. *शिक्षण विभागातील हा घोटाळा नागपूर विभागात मर्यादित नसून त्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे. ही बाब लक्षात आणून देत प्रकरणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेता प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची आग्रही मागणी आमदार संदीप जोशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती.
या मागणीची मुख्यमंत्री फडणवीस यांनी दखल घेतली असून कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही सुरू झाली आहे.

## वाशीमची मिताली काबरा राज्यात टॉपर

### ९९ टक्के गुण



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ५ :
अमरावती विभागात बारावी परीक्षेच्या निकालात वाशीम जिल्हा अव्वल ठरला आहे. वाशीमचा ९५.६६ टक्के निकाल लागला असून विभागात जिल्हा प्रथम आहे. बारावी परीक्षेच्या निकालात नेहमीप्रमाणे मुलींनीच बाजी मारली. ९७.०५ टक्के मुली, तर ९४.६४ टक्के मुले उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्यातील मिताली काबरा हिने ९९ टक्के गुण प्राप्त केले. मिताली राज्यात अव्वल असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल दुपारी १ वाजता संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. वाशीम जिल्ह्यातून बारावीच्या परीक्षेसाठी एकूण २० हजार ६८८ अर्ज दाखल करण्यात आले होते. त्यापैकी २० हजार ५७६ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. यातील ९५.६६ टक्के म्हणजेच १९ हजार ६८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.
त्यामध्ये ११ हजार २६९ मुले, तर आठ हजार ४१४ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. वाशीम जिल्ह्यामध्ये सर्वाधिक ९७.१५ टक्के निकाल वाशीम तालुक्याचा लागला. मालेगाव ९६.२९, रिसोड ९७.११, कारंजा ९०.८९, मंगरुळपीर ९४.४४ व मानोरा तालुक्याचा ९३.६१ टक्के निकाल लागला आहे.
दरम्यान, वाशीम तालुक्यातील तोंडगाव येथील मिताली मनीष काबरा हिने बारावी परीक्षेत ६०० पैकी ५९४ (९९ टक्के) गुण प्राप्त केले. इयत्ता बारावी परीक्षेच्या निकालात मिताली ही राज्यात अव्वल असण्याची शक्यता आहे. मिताली ही तोरणाळा येथील ममता इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी आहे. मिताली हिला विज्ञान शाखेत ९९ टक्के गुण मिळाले. दहावीमध्ये तिने आयसीएसई मंडळातून ९८.६० टक्के गुण मिळवले होते.
मितालीचे वडील मनीष हे मूळ तोंडगाव येथील असून ते सध्या छत्रपती संभाजीनगर येथे सनदी लेखापाल आहे. मितालीची आई शिल्पा काबरा संगणक अभियांत्रिकीमध्ये पीएच.डी. केली आहे. त्या सुद्धा छत्रपती संभाजीनगर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मितालीला पुढील शिक्षण मॅप अॅण्ड कॉम्प्युटिंग या क्षेत्रात करिअर करायचे आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय आई वडील आणि आजोबा राजेश लड्ढा यांच्यासह कुटुंबियांना दिले. या यशाबद्दल मितालीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## हवाई दल अलर्ट, राफेल सज्ज

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
हवाई दल प्रमुखांनी पंतप्रधान मोदींना युद्ध तयारीची माहिती दिली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रविवारी झालेल्या बैठकीत एअर चीफ मार्शल एपी सिंह यांनी पंतप्रधानांना सांगितले की, हवाई दल सतर्क आहे. ते म्हणाले की, पश्चिम सीमेवरील आपले संरक्षण नेटवर्क पूर्णपणे सक्रिय आहे आणि राफेलसारखे लढाऊ विमान देखील सज्ज आहेत.
जम्मू आणि काश्मीरमधील पूंछ येथे सोमवारी सुरक्षा दलांना दहशतवाद्यांचा एक अड्डा सापडला. येथे ५ आयईडी, वायरलेस सेट आणि काही कपडेही जप्त करण्यात आले आहेत.
हे लपण्याचे ठिकाण पूंछमधील सुरणकोट येथील मरहोत गावात सापडले. सुरक्षा दलांचे म्हणणे आहे की हे दहशतवाद्यांसाठी लपण्याचे ठिकाण आहे.
या घटनेनंतर, श्रीनगर मध्यवर्ती कारागृह आणि जम्मूमधील कोट बलवाल कारागृहातील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. तेथे अनेक दहशतवादी तुरुंगात आहेत, जे हल्ल्यांमध्ये मदत करतात. गुप्तचर यंत्रणेच्या अलर्टनंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

## एका गुलाबामुळे दुसरा गुलाब नाराज?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
जळगावचे आमदार आणि जलसंपदामंत्री गुलाबराव पाटील यांचे कट्टर विरोधक गुलाबराव देवकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश करताच महायुतीतून नाराजीचे सूर उमटले आहे.
या घडामोडींनंतर मंत्री गुलाबराव पाटील यांनी उघडपणे आपला रोष व्यक्त करत, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरच निशाणा साधला. देवकर हेच अजितदादांना काळे झेंडे दाखवणारे, खोके म्हणणारे... आता अचानक ओकेह्व कसे झाले? असा रोखठोक सवाल करत पाटील यांनी देवकर यांचा पक्षप्रवेश म्हणजे "गद्दारांना संरक्षण" असल्याचा आरोप केला.
पाटील पुढे म्हणाले, भ्रष्टाचाराच्या शंभर गोष्टी अजून बाहेर यायच्या आहेत. तेव्हा अजितदादा स्वतःच म्हणतील की गुलाबराव पाटील बरोबर होते.ह्व त्यांनी हेही स्पष्ट केलं की, ह्या प्रवेशापूर्वी एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाली असती, तर हे चुकीचं पाऊल टाळता आलं असतं.
या पक्षप्रवेशामुळे महायुतीतील एकजूट व समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं असून, पाटील यांच्या प्रतिक्रियेनंतर गटांतर्गत संघर्ष पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

## रामझुल्यावर पुन्हा हिट अॅन्ड रन

### दोघांचा दुर्दैवी मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
रामझुल्यावर पुन्हा एकदा हिट अॅन्ड रनची घटना पुढे आली आहे. दुचाकीस्वार दोन तरुणांना भरधाव अज्ञात वाहनाच्या चालकाने जबर धडक दिली आणि फरार झाला. यात गंभीर जखमी तरुणांचा उपचारादरम्यान काही वेळातच मृत्यू झाला.
या घटनेने जवळपास वर्षभरापूर्वी घडलेल्या अपघाताची पुन्हा एकदा आठवण करून दिली आहे. मद्यधुंद अवस्थेत आलीशान कार चालवत असलेल्या महिलेने दुचाकीस्वार दोघांना उडविले होते. त्या अपघातातही दोन्ही तरुणांचा मृत्यू झाला होता. हे प्रकरण बरेच दिवस चर्चेत राहिले. तशीच काहीशी घटना रविवारी रात्री 1.30 वाजताच्या सुमारासही घडली. चिरंजित इंद्रलाल घर्टी (27) रा. कोराडी आणि प्रकाश ओमप्रकाश मगर (18) रा. सदर अशी मृतांची नावे आहेत.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रकाश आणि चिरंजित हे दोघेही सदर परिसरातील बार्बेक्यू रेस्टॉरंटमध्ये कुक होते. रविवारी रात्री 1.30 वाजता ते चिरंजितच्या दुचाकीने मेयो रुग्णालयाकडून सदरकडे जात होते. रामझुला चढून काही अंतरावर जाताच चुकीच्या बाजूने भरधाव आलेल्या अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांना जबर धडक दिली आणि पळून गेला. रस्त्याने ये-जा करणाऱ्या लोकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली.
घटनेची माहिती मिळताच गणेशपेठ पोलिस घटनास्थळी पोहोचले. दोन्ही जखमींना उपचारार्थ मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले. पोलिसांनी चिरंजितचे वडील इंद्रपाल यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवला आहे.

**घटनेचा कोणीही प्रत्यक्षदर्शी नाही**
गणेशपेठचे प्रभारी ठाणेदार गोकुल महाजन यांनी सांगितले की, अपघाताचा कोणीही प्रत्यक्षदर्शी नाही. हे स्पष्ट आहे की, चुकीच्या बाजूने आलेल्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली, मात्र ते वाहन कोणते होते हे स्पष्ट होऊ शकले नाही. रामझुल्यावर सीसीटीव्ही कॅमेरे नाही. पोलिस मेयो रुग्णालय आणि जयस्तंभ चौकाकडील कॅमेऱ्यांची फुटेज तपासत आहेत.

## शेत, पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण काढताना पोलिस बंदोबस्त मिळणार

### राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या पुढाकाराने राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेत आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण काढताना व मोहीम राबवताना पोलिस बंदोबस्त द्यावा, असे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. गृह विभागाच्या संमतीने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत शेत व पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित झाला होता. त्यानंतर नियोजन विभागाने 27 फेब्रुवारी 2018 रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना काढल्या आहेत. यानुसार पोलिस यंत्रणेमार्फत बंदोबस्त पुरवण्यात यावा, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामध्ये शेतमाल वाहतुकीसाठी महत्त्वाच्या रस्त्यांवरील अतिक्रमण हटवण्याच्या मोहिमेसाठी सुरळीत पोलिस बंदोबस्त असावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे पाणंद रस्ते विकास होण्याच्या मोहिमेला वेग येणार आहे.
विविध योजनांच्या अभिसरणातून 'पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजना' राबवण्याचा निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णय हा गृह विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयामधील 'पोलिस यंत्रणेची जबाबदारी' ज्या ठिकाणी अतिक्रमण धारक शेतकरी हे नियमानुसार कार्यवाहीस प्रतिसाद देत नाहीत, अशा ठिकाणी पोलिस बंदोबस्तामध्ये अतिक्रमण काढण्यात यावे, या बंदोबस्तासाठी पोलिस यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचा शुल्क आकारण्यात येवू नये." अशी तरतूद करण्यात आलेली आहे, असे अध्यादेशात नमूद करण्यात आले आहे.
शेत व पाणंद रस्त्याचे अतिक्रमण काढताना, सर्व प्रकारच्या रस्त्यांची मोजणी करताना पुरवलेल्या पोलिस बंदोबस्तासाठी शुल्क न आकारण्याबाबत तसेच मोजणी करताना कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत आवश्यक ते निर्देश क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्यावेत, असेही नमूद आहे.

# हम भी खड़े हैं राहों में...



■ **छत्रपती संभाजीनगर :** राज्यात महायुती सरकारला सत्तेवर येऊन शंभर दिवस पूर्ण झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने या शंभर दिवसांच्या कालावधीतील कामगिरीचे प्रगतीपुस्तक नुकतेच सादर केले.

यामध्ये राज्यातील 48 विभागांची माहिती, प्रगतीचे टक्केवारीनुसार मूल्यांकन आणि सुरु असलेल्या योजनांची आकडेवारी देण्यात आली आहे. मात्र या यादीत अल्पसंख्यांक मंत्रालयाचा कुठेही उल्लेख नसल्यामुळे एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार इम्तियाज जलील यांनी सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली आहे.

इम्तियाज जलील यांनी आपल्या एक्स हँडलवरून प्रतिक्रिया देत मुख्यमंत्री फडणवीस यांना शायराना अंदाजात सुनावले झ "हम भी खड़े हैं राहों में, जरा नजर-ए-इनायत इधर भी कीजिए कभी." त्यांनी यामाध्यमातून सरकारने अल्पसंख्यांक समाजाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे.

इम्तियाज जलील म्हणाले की, मुख्यमंत्री महोदय, राज्यातील अल्पसंख्यांक समाजही या राज्याचा घटक आहे. मग त्यांच्या समस्या, त्यांची प्रगती, त्यांच्यासाठीच्या योजना या तुमच्या यादीत का नाहीत?, राज्यातील महायुती सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यकाळात अल्पसंख्यांक मंत्रालयाची दखलही न घेणे, ही अतिशय गंभीर बाब आहे. जर तिरुपती, शिर्डी संस्थानावर तुम्ही आमची नियुक्ती करणार नसाल, तर वक्फ बोर्डात हस्तक्षेप करण्याचा अधिकार तुम्हाला कसा? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

# साडेचार फुटी मंत्री म्हणतो....

## वडेट्टीवार यांची तिखट टीका



■ **मुंबई :** देशात व राज्यात सध्या जातीयवादाचे विष पेरले जात आहे. बीडमध्ये तर दोन जाती एकमेकांपुढे उभ्या टाकल्या जात आहेत. अशा स्थितीत महायुती सरकारचा एक साडेचार फुटांचा मंत्री नागरिकांना धर्म विचारून दुकानातून सामान विकत घेण्याचे सांगत आहे, अशा तिखट शब्दांत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्याचे कॅबिनेट मंत्री नीतेश राणे यांच्यावर निशाणा साधला आहे.

मंत्री नीतेश राणे यांनी नुकतेच दापोली येथील सभेत हिंदू धर्मियांना दुकानदारांकडून धर्म विचारून खरेदी-विक्री करण्याचा सल्ला दिला होता. दुकानदाराला धर्म विचारून वस्तू खरेदी करा. विशेषतः त्याच्या धर्माविषयी शंका आल्यास त्याला हनुमान चालीसा म्हणायला लावा, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानाचे राजकीय वतुर्ळांत तीव्र पडसाद उमटत असताना विजय वडेट्टीवार यांनी उपरोक्त शब्दांत त्यांच्यावर निशाणा साधला आहे. सद्यस्थितीत देशात व राज्यात जातीयतेचे विष पेरले जात आहे. बीडमध्ये दोन जाती एकमेकांच्या विरोधात उभ्या केल्या जात आहेत. त्यातच आता राज्य सरकारचा साडेचार फुटाचा एक मंत्री जनतेला जात विचारून दुकानातून सामान घेण्याचे सांगत आहे, असे ते म्हणाले.

वडेट्टीवार यांनी यावेळी सत्ताधारी भाजपवरही निशाणा साधला. ते म्हणाले, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे काँग्रेसला फोडून रिकामे करण्याची वल्गना करत आहेत. पण आमचे दिवस आले तर आम्हीही चुनचुनके मारू. एकनाथ शिंदे व अजित पवारांची काय परिस्थिती आहे. त्यांचा केवळ वापर केला जात आहे. पुढच्या निवडणुकीत ते कुठे असतील हे पहावे लागेल. सरकारने सीबीआय व ईडीला बाजूला करावे. त्यानंतर काय होते ते पहावे. या सरकारने शेतकऱ्यांची घोर फसवणूक केली. यांना 10 दिवस लोटले तरी पहलगाम अतिरेकी हल्ल्यातील आरोपी सापडत नाहीत. ते कधी ते सापडणार? हे या सरकारने सांगावे. अतिरेक्यांचे कपडे भेटले, लोकेशन भेटले, मग अतिरेकी का सापडत नाहीत.

# एजाज खानचा 'हाऊस अरेस्ट' होणार बंद



■ **मुंबई :** उल्लू ॲपवर 'हाऊस अरेस्ट' नामक शोवरून नवा वाद सुरू झाला आहे. या शोवर बंदी घालण्याची मागणीने जोर धरला आहे. शोमध्ये अश्लीलता प्रसारित केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी सोमवारी अभिनेता एजाज खानला नोटीस बजावली. या नोटिशीत खान आणि ज्या उल्लू ॲपवर हा शो प्रसारित झाला होता त्या उल्लू ॲपच्या मालकाला तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहून त्यांचे जबाब नोंदवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या शोच्या विरोधात महिला आयोगाने देखील दाखल घेत कारवाई करण्याची मागणी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर म्हणाल्या की, शोमध्ये स्पर्धकांकडून विचारल्या जाणाऱ्या अश्लील प्रश्नांबद्दल अनेक महिलांनी तक्रार केली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या डीजीपींना कारवाई करण्याचे पत्र लिहिले आहे आणि या प्रकरणी गुन्हाही दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती चाकणकर यांनी दिली आहे.

रूपाली चाकणकर म्हणाल्या, या शोबद्दल आम्हाला अनेक तक्रारी आल्या आहेत ज्यात असे म्हटले आहे की शोमधील स्पर्धकांना अश्लील प्रश्न विचारले जातात आणि अशाच प्रकारच्या कृती करण्यास सांगितले जाते. आम्ही कारवाईसाठी डीजीपी कार्यालयाला पत्र लिहिले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या शोवर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी देखील प्रतिक्रिया देत संताप व्यक्त केला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली अश्लीलतेला मोकळं रान देणं थांबवा! एजाज खानच्या ह्यहाऊस अरेस्टह्न शो वर बंदी घाला, अशी मागणी भाजपच्या विधानपरिषदेच्या आमदार चित्रा वाघ यांनी केली आहे. चित्रा वाघ यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही मागणी केली आहे.

# दादांनी पैसे घरी नेलेत काय?

## मुश्रीफांचा शिरसाट यांना सवाल : वरिष्ठ नेत्यांविषयी विचार करून बोलण्याचा सल्ला



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** महाराष्ट्रात महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी योजना म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना. परंतु हीच योजना आता सरकारसाठी अडचण ठरत आहे. लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्यात आला असल्याने सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी नाराजी व्यक्त केली होती. सामाजिक न्याय विभागाची गरजच वाटत नसेल तर बंद करावे, असे शिरसाट म्हणाले होते. यावर आता अजित पवार गटाचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी खडेबोल सुनावले आहेत.

लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्यात आला असल्याने संजय शिरसाट यांनी नाराजी व्यक्त करत म्हटले होते, या खात्याचा निधी कायदेशीरपणे दुसरीकडे वळवता येत नाही, ना त्यात कपात करता येते. पण अर्थ खात्याकडून आपले डोके जास्त चालवले जात आहे. अर्थ खात्यात शकुनी महाभाग बसले आहेत, असे म्हणत त्यांनी अर्थ खात्यावर टीका केली होती. तसेच, जर सरकारला सामाजिक न्याय विभागाची गरजच वाटत नसेल, तर ते खातेच बंद करा, असेही त्यांनी म्हटले.

संजय शिरसाट यांच्या या टीकेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी पलटवार केला आहे. ते म्हणाले, सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाठ हे माझे चांगले मित्र आहेत. परंतु ते नव्याने मंत्री झालेले आहेत. त्यांनी ज्यावेळी ही गोष्ट घडली असे त्यांना वाटले, त्यावेळीच वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांना घेऊन त्यांनी बसायला पाहिजे होते.

वस्तुस्थिती समजून घ्यायला पाहिजे होती. आपल्याच एका ज्येष्ठ नेत्याला अशी उपमा देणे हे अतिशय अयोग्य आहे. अजित दादा हे काय आकाशातून पैसे आणणार नाहीत किंवा हे पैसे काही अजित दादांनी घरी नेलेले नाही.

पुढे बोलताना हसन मुश्रीफ म्हणाले, पैसे देताना ओढाताण होते आहे हे साहजिक आहे. मात्र असे बोलणे बरोबर नाही. आपण सगळ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण करत आहोत. त्यामुळे शिरसाठ यांनी बोलताना विचार करून बोलले पाहिजे. असे खडेबोल हसन मुश्रीफ यांनी सुनावले आहेत. त्यामुळे लाडकी बहीण योजनेवरून महायुतीच्या या दोन नेत्यांमध्येच जुंपली असल्याचे दिसत आहे.

माझ्या खात्याचे पैसे इतरत्र वर्ग करण्यात आल्याचे मला माध्यमांतून समजले. याबाबत मला कोणतीही कल्पना नव्हती. जर सामाजिक न्याय खात्याची सरकारला गरज वाटत नसेल, तर ते सरळ बंद करा. हा अन्याय आहे की कट, हे मला माहित नाही. मात्र, यावर मी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहे. माझ्या खात्याचा निधी ना वर्ग करता येतो, ना त्यात कपात करता येते, असे शिरसाठ म्हणाले होते. निधी वळवण्यावरूनचा वाद अद्यापही सुरू आहे.

# डोनॉल्ड ट्रम्प यांना विचारून पाकवर कारवाई करणार का?



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** पहलगामच्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने अमेरिकी राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारमधील सलाहकार जेसन मिलर यांची नेमणूक केली, असे वृत्त पाकिस्तानमधील डॉन या वृत्तपत्राने दिले आहे.

या प्रकरणावर वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारला थेट सवाल केला असून, एका सार्वभौम राष्ट्राला परकीय व्यक्तीची वकिली का लागावी, असा मुद्दा उपस्थित केला आहे. तसेच जेसन मिलरकडून परवानगी आल्याशिवाय आपण पहलगाम प्रकरणी काही कारवाई करणार नाही का? याचा खुलासा भारतीय जनतेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करावा, अशी मागणीही प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय जनता पाकिस्तानच्या विरोधात कारवाईची मागणी करत आहे. हल्ल्याच्या घटनेला आठवडा उलटून गेला आहे. मात्र, सरकारकडून कोणतेही पाऊल उचलण्यात आले, अशी परिस्थिती दिसत आहे. सामान्य जीवन सुरू असल्याची परिस्थिती भासवली जात असल्याचे प्रकाश आंबेडकर म्हणालेत.

पाकिस्तानच्या डॉन वृत्तपत्रात एक बातमी आली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचे मित्र जेसन मिलर नावाच्या व्यक्तीची नेमणूक करण्यात आली आहे. ही नेमणूक नेमकी पाकिस्तानवर जी कारवाई करायची आहे, ती करण्यासाठी या सल्लागाराकडून परवानगी मागितली जाणार का? अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना विचारून पाकिस्तानवर कारवाई करणार का? असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

**केंद्र सरकारकडे पारदर्शकतेचा अभाव**

देशाकडे स्वतःचे परराष्ट्र मंत्रालय असताना भारताला परकीय सल्लागाराची गरज भासते हे चिंताजनक आहे, असे म्हणत आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप केला. भारत सरकारने या प्रकरणात पारदर्शकता दाखवावी आणि नेमणुकीचे कारण व उद्दिष्ट देशातील नागरिकांसमोर ठेवावे, अशी मागणी त्यांनी केली.

या प्रकरणात आंबेडकर यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याकडे प्रश्न उपस्थित केले आहेत. जेसन मिलर यांची नेमणूक केंद्र सरकारने केली का? जर हो, तर त्यामागचे कारण काय आहे? असा थेट सवाल करत त्यांनी या बाबतीत केंद्र सरकारने खुलासा करावा, अशी मागणी केली.

भारत सरकार आता जेसन मिलर यांच्या परवानगीशिवाय कोणताही निर्णय घेणार नाही का? असा गंभीर सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. जर एखाद्या विदेशी व्यक्तीला भारतात धोरणात्मक जबाबदारी दिली जात असेल, तर त्याबाबत संपूर्ण पारदर्शकता व उत्तरदायित्व असणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

जेसन मिलर हे यापूर्वी अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे मुख्य सल्लागार होते. अशा पार्श्वभूमीच्या व्यक्तीची भारतासारख्या देशात नियुक्ती होणे, हे अनेक प्रश्न निर्माण करणारे ठरत आहे.

परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत भारत स्वतः सक्षम असून, विदेशी व्यक्तीच्या सल्ल्याची आवश्यकता का भासली, हे केंद्र सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी आंबेडकरांनी केली.

या संपूर्ण प्रकरणावर तातडीने उत्तर देत केंद्र सरकारने देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणते पावले उचलली आहेत, हे सांगणे गरजेचे असल्याचे आंबेडकरांनी म्हटले आहे. देशाच्या धोरणांत कोणताही परकीय हस्तक्षेप होऊ नये, यासाठी सरकारने स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे, अशी मागणीही प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

# ते वक्तव्य म्हणजे उर्मट मस्ती

## बावनकुळेंच्या विधानावर वर्षा गायकवाडांचा पलटवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** काँग्रेस पक्ष खाली करणे हे काय भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना काँग्रेसला संपवणे हे मकाऊमधल्या कॅसिनोतील गेमसारखे वाटत असेल, तर तो भाजपचा मोठा गैरसमज असल्याचे काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी ठणकावून सांगितले आहे.



खासदार वर्षा गायकवाड पुढे बोलताना म्हणाल्या की, एखादा पक्ष संपवण्याची भाषा करणे ही राजकीय मस्ती आहे. बोलताना थोडे तरी विचार करणे गरजेचे आहे. याआधी सुद्धा भाजपने काँग्रेस मुक्त भारत अशी घोषणा केली होती, पण त्या स्वप्नांचीही धुळधाण झाली, 400 जागांचे स्वप्न पाहणारे 240 वरच थांबले.

वर्षा गायकवाड म्हणाल्या की, काँग्रेस ही फक्त एक पक्ष नाही, तर लोकांच्या मनात खोलवर रुजलेला विचार आहे, 135 वर्ष जुना पक्ष केवळ वक्तव्य करून संपवता येणार नाही.

चंद्रशेखर बावनकुळे पुण्यात बोलताना म्हणाले की, काँग्रेसला फोडा, काँग्रेस रिकामी करा. काँग्रेसमधून कोणी आले तरी तुमचं विचार अगोदर करणार, असे निर्देश चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप पदाधिकाऱ्यांना दिल्या. पुढच्या काळात पक्षाचे संघटन अधिक मजबूत करून केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना सामान्य माणसांपर्यंत पोहोचवा. काँग्रेसला लोक सोडून चालली आहेत. संग्राम थोपटे यांनी सगळे काँग्रेसला दिले तरी सुद्धा त्यांना पक्ष सोडावा लागला. त्यांना त्यांच्या पक्षाकडून, राहुल गांधी यांच्याकडून अपेक्षा नाहीत. कुठले ही धोरण काँग्रेसला नाही. जो जो काँग्रेस किंवा इतर पार्टी मधून आमच्याकडे येईल त्याचे स्वागत आहे. काँग्रेसला फोडा, काँग्रेसला रिकामी करा. तुम्ही थकून जाल इतके जण आमच्याकडे येत आहेत. काँग्रेसची लोक आपल्याकडे आली तरी तुमचा आधी विचार करणार, असे ते यावेळी म्हणाले होते.

माधव भांडारी यांना का संधी मिळाली नाही? ते कट्टर भाजपचे आहेत. विधान परिषदेसाठी स्वतःच्या कार्यकर्त्यांना संधी न देता बाहेरून आलेल्यांना दिले जाते. भाजप आता कार्यकर्त्यांचा नव्हे, तर बाहेरून आलेल्यांचा पक्ष झाला आहे, असे गायकवाड यांनी ठणकावून सांगितले.

वर्षा गायकवाड म्हणाल्या की, जे लोक सत्तेसाठी किंवा दबावामुळे पक्ष सोडतात, ते कोणाचेही नसतात. काँग्रेसमध्ये आता जे लोक आहेत, ते खरे आणि निष्ठावान कार्यकर्ते आहेत. मला त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे, असे म्हणत वर्षा गायकवाड यांनी पक्षातील उरलेल्या कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले.

# राऊतांकडून शरद पवारांना पुस्तक प्रकाशनाचे निमंत्रण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली.

यावेळी दोघांमध्ये राज्य व देशातील विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. याचवेळी राऊतांनी त्यांच्या नरकातला स्वर्ग या पुस्तक प्रकाशनाचे आमंत्रण देत या पुस्तकाची प्रत देखील भेट दिली. तर शरद पवार यांनी देखील राऊतांना बारामतीमधल्या युवा वन्यजीव छायाचित्रकार रोहन तावरे यांचे एक पुस्तक भेट दिले.

शरद पवार यांनी या भेटीबद्दल सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली. यावेळी त्यांनी या भेटीतील काही फोटो देखील शेअर केलेत. संजय राऊत यांनी आज माज्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीच्या वेळी त्यांनी आपल्या लेखणीतून साकारलेल्या नरकातील स्वर्ग या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाचे औपचारिक निमंत्रण दिले.

# गोळ्या वेळेवर घेत चला... रोहिणींचा चित्रा वाघला सल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** ज्या लोकांना साधे नागरिक शास्त्र कळत नाही, त्या लोकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदारकी देऊ नका, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्यावर टीका केली आहे. चित्रा वाघ यांना फडणवीसांच्या गूड बूकमध्ये राहायचे आहे हे आम्हाला ठावूक आहे. पण त्यासाठी त्यांनी आपल्या गोळ्या वेळेवर घ्याव्यात, असा टोलाही त्यांनी यावेळी त्यांना हाणला.



भाजप आमदार चित्रा वाघ यांनी मुळशी तालुक्यातील पौड येथील अन्नपूर्णा देवीच्या मूर्तीच्या विटंबनेवरून खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर टीका केली होती. युक्रेन युध्दावर तुम्ही तावातावाने मतं मांडता, पण तुमच्या मतदारसंघात पौड गावात जो घृणास्पद आणि संतापजनक प्रकार घडला त्यावर चार ओळींचे ट्विट टाकून गप्प आहात...?

त्या हरामखोरानं नागेश्वर मंदिरात घुसून अन्नपूर्णा मातेवर अतिप्रसंग केला नाही, तर समस्त हिंदू महिलांना एक चेतावणी दिली आहे. तुष्टीकरणाचं राजकारण सुचतंय का..? तुमच्या मतदार संघात दहशतवादी वृत्तीची ही पिल्लावळ आहेङ्ग त्यांच्या आणि पहलगाव मधल्या दहशतवाद्यांमध्ये काडीचाही फरक नाही.

चित्रा वाघ यांच्या या टीकेनंतर रोहिणी खडसे यांनी त्यांच्यावर जोरदार पलटवार केला. तसेच त्यांना आपल्या गोळ्या वेळेवर खाण्याचाही सल्ला दिला. त्या म्हणाल्या, मुख्यमंत्री फडणवीस यांना माझी विनंती आहे की ज्यांना साधं नागरिक शास्त्र कळत नाही त्यांना आमदारकी देऊ नका ओ! ताई, जरा वेळेवर गोळ्या घेत चला, असे रोहिणी खडसे म्हणाल्या.



■ *नवी दिल्ली : राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांनी दिल्ली येथे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंती महोत्सवाचे निमंत्रण दिले.*

# मोबाईल आणि समाज माध्यमाचा उपवास करणे गरजेचे

## गौर गोपाल दासांचे मंत्रालयात जोरदार भाषण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी 'टेक वारीः महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' दिनांक 5 मे ते 9 मे दरम्यान मंत्रालयात साजरा केला जात आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद देखील साधला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गौर गोपाल दास यांना आमंत्रित करण्यात आले होते.



यावेळी बोलताना गौर गोपाल दास यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. मराठी भाषेवर बोलताना ते म्हणाले, भाषा कुठली बोलायची यापेक्षा आपला मुद्दा पोहचणे गरजेचे आहे. भाषा ही महत्त्वाची असतेच, आपल्याला मराठीचा गर्व असलाच पाहिजे. पण, मराठी बोलता बोलता जर आपला मुद्दाच पोहचला नाही तर मराठीचे काय लोणचे घालायचे? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

मोबाईल आणि समाज माध्यमाचा उपवास करणे गरजेचे असल्याचे देखील त्यांनी मत व्यक्त केले. हा उपवास केला तर देव साक्षात खाली येईल आणि म्हणेल आता काय रडवतो का?, असे म्हणताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

**प्रेमाची भाषा टेक्नोलॉजीने बदलली**

गौर गोपाल दास म्हणाले. आता प्रेमाची भाषा टेक्नोलॉजीने बदलली आहे. आपण टेक सेवी झालो आहे. तांत्रिक प्रगती आपण केलेली आहे. आपण टेक्नॉलॉजीला अडॉप्ट केले आहे. आपण वैयक्तिक जीवनात टेक्नोलॉजीचा वापर करत आहोत, पण आपल्या कामात आपण टेक सेव्ह झालो आहे का? आपल्या कामात हे करणे गरजेचे आहे, म्हणून आपण आयुष्यभर विद्यार्थी असलो पाहिजे. आपल्याला अल्जाइमर नाही झाला पाहिजे म्हणून आपण मेंदू ॲक्टिव ठेवला पाहिजे.

**ॐ इग्नोराय नमः**

माणसाने नेहमी शिकत राहावे हे समजाऊन सांगताना गौर गोपाल दास यांनी घारीचे उदाहरण दिले. ते म्हणाले, घारीच वय 70 वर्ष आहे पण 40 झाले की तिच्या पंखातले बळ कमी होते, मासा पकडणारी चोच कमकुवत होती, नखांना धार राहत नाही. जर नवीन टेकला अपडेट केले नाही तर मरून जाल. त्रास नाही तर आयुष्य नाही.

घार डोंगरावर जाऊन सगळे जुने पंख नखे काढून टाकते. दोन-तीन महिन्यांनी सगळे नवे येते त्यानंतर ही घार उंच भरारी घेण्यासाठी तयार असते. यावेळी मंत्रालयात मंत्रपठन सुद्धा करण्यात आले. ॐ इग्नोराय नमः हा मंत्र आरोग्य डिजिटल सेवी होण्यासाठी वापरायचा आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**मराठीचा अभिमान आहे ळ**

गौर गोपाल दास 'टेक वारी'चा अर्थ समजाऊन सांगताना म्हणाले, टेक वारीतला हा पहिला शब्द टेक हा आहे, तर घाबरू नका, भरपूर संधी आहे. 100 दिवसात 5 लाख कर्मचाऱ्यांनी नोंदणी केली आहे. आपण मराठी महाराष्ट्रीयन शिकण्यासाठी किती उत्साही आहोत. मराठी मधला ळ गेला तर होळी नाही, पोळी नाही, मिसळ नाही, काही नाही, मराठीचा अभिमान आहे ळ, असंही पुढे गौर गोपाल दास म्हणाले.

टेक वारीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उद्घाटन करण्यासाठी चक्क रोबोटने अजित पवारांना कात्री आणून दिली, त्याचा संदर्भ देत नीट काम करा नाहीतर तुमच्या जागी रोबोट येईल, असे अजित पवार म्हणाले. येथील कार्यक्रमात स्वागतावेळी टॉवेल आकाराची शॉल दिली, त्यावरून अजित पवारांनी टोला लगावला.

# नव्याने एफआयआर करण्याची गरज नाही

## ■ अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरण : सर्वोच्च न्यायालयाचा राज्य सरकारला दिलासा ■

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** ठाणे जिल्ह्यातील बहुचर्चित अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणात नव्याने एफआयआर दाखल करण्याची आवश्यकता नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले असून, यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशात बदल करण्यात आला असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे.

या प्रकरणी न्यायमूर्ती बेला त्रिवेदी आणि न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. महाराष्ट्र सरकारने उच्च न्यायालयाच्या 7 एप्रिल 2024 च्या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आज या याचिकेवर निकाल देण्यात आला. राज्य सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी बाजू मांडली.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरणात नव्याने एफआयआर दाखल करण्याची गरज नाही. प्रकरणाचा तपास विशेष तपास पथका मार्फतच होणार असून, हे पथक पोलिस महासंचालकांच्या देखरेखीखाली कार्यरत राहील.

शिंदे कुटुंबियांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका स्वतःहून मागे घेतल्यामुळे, न्यायालयाने स्पष्ट केले की त्यांना नोटीस देण्याची आवश्यकता नाही. राज्य सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी बाजू मांडताना सांगितले की,





चौकशी कोणत्या अधिकाऱ्याने करावी हे आता डीजीपी ठरवतील. याआधी मुंबई उच्च न्यायालयानेच चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती, परंतु सर्वोच्च न्यायालयाने त्या आदेशात बदल केला आहे. न्यायालयाने तक्रारदारांना सत्र न्यायालय अथवा मजिस्ट्रेटकडे दाद मागण्याचा पर्याय उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

बदलापूरमधील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींवरील अत्याचार प्रकरणात सफाई कामगार अक्षय शिंदे मुख्य आरोपी होता. 23 सप्टेंबर 2024 रोजी, त्याला तळोजा कारागृहात नेत असताना, पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत त्याचा मृत्यू झाला.

हा एन्काउंटर बनावट असल्याचा आरोप करण्यात आला होता. यानंतर उच्च न्यायालयाने जबाबदार पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. मात्र, गुन्हा दाखल झाला नसल्याने सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

# वाळवणावर पडले अवकाळीचे विरजण

**गोंदिया :** उन्हाळ्याची चाहूल लागताच म्हणजेच मार्च महिन्यापासून गृहिणी वाळवणाचे विविध खाद्यपदार्थ तयार करण्यास सुरुवात करतात. आता ऊन चांगले तापत असून घरोघरी सध्या वाळवणाचे पदार्थ तयार केले जात आहेत. मात्र, पंधरवड्यापासून सुरू असलेले ढगाळ वातारवण व पावसाच्या खेळामुळे महिलांचे नियोजन विस्कटत असून कित्येकांचे तर पावसाने नुकसान केले आहे.

गत काही वर्षांपासून महागाईने चांगलाच जोर धरला आहे. जणू काही देशात महागाईचा आगडोंब उसळला आहे. यात सर्वसामान्य माणूस होरपळला जात आहे. उन्हाळ्यात गृहिणी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करून वर्षभर साठवून ठेवतात; पण महागाईने कळस गाठल्याने वाळवणाचे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांची खरेदी करताना गृहिणींची दमझाक होत आहे. उन्हाळ्यात शेवया, सरगुंडे, साध्या कुरडया, रंगबेरंगी फुलासारख्या कुरड्या, पापड, वड्या, आलू चिप्स, लोणचे आदी खाद्यपदार्थ तयार केले जातात; पण हे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी किमान दिवसभर कडक ऊन तापणे गरजेचे असते; पण सध्या दिवसभर कडक ऊन राहीलच, याची शाश्वती नाही. सकाळी जरी ऊन तापले तरी लगेच दुपारी ढगाळ वातावरण निर्माण होते. पाऊस बरसण्याची शक्यता असते.

# तेढवा नाल्यातील बंधाऱ्यात अडले पुजारीटोलाचे पाणी

## शहरातील पाणीटंचाई प्रश्न होऊ लागला गंभीर



**गोंदिया :** शहरासह लगतच्या कुडवा व कटंगी या दोन गावांची तहान भागविणारी वैनगंगा नदी यंदा कोरडी पडल्याने पुजारीटोला प्रकल्पातून पाणी आणण्याची पाळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर आली आहे. यामुळे पुजारीटोला प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले आहे. मात्र, तेढवा गावाजवळील नाल्यातील बंधाऱ्यामध्ये पाणी अडून पडले आहे. अशात आता हे बंधारे तोडण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची धडपड सुरू असून, हे बंधारे तोडल्यानंतरच पाणी पुढे जाऊन वैनगंगेला मिळणार आहे.

यंदा वैनगंगा नदीने साथ सोडल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणला पुजारीटोला प्रकल्पाचे पाणी मागविण्याची पाळी आली. यानुसार, २५ एप्रिल रोजी पुजारीटोला प्रकल्पातून वैनगंगा नदीसाठी पाणी सोडण्यात आले आहे. पुजारीटोलाचे पाणी काटी गावाजवळील तेढवा या गावाजवळून जाणाऱ्या नाल्यात घेण्यात आले आहे. मात्र, या नाल्यावर पाणी अडवून ठेवण्यासाठी आठ बंधारे तयार करण्यात आले आहेत. पुजारीटोला येथून सोडलेले पाणी या बांधांमध्ये अडून पडल्याने पुढे सरकत नसल्याने नदीत थोडकेच पाणी आल्याची माहिती मिळाली.

अशात आता हे बंधारा फोडणे गरजेचे असून, त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून जिल्हा परिषद सिंचन विभागाला पत्र देण्यात आले आहे. त्यानंतर त्यांच्या कनिष्ठ अभियंत्यांनी सोमवारी (दि.२) संबंधित नाला व त्यावरील बंधाऱ्याची पाहणी केल्याची माहिती मिळाली. पुजारीटोलाचे पाणी पुढे जावे, यासाठी हे आठही बंधारे काही प्रमाणात फोडणे गरजेचे असून, त्यासाठी जिल्हा परिषद सिंचन विभागाची परवानगी गरजेची आहे. अशात आता हे बांध फुटल्यानंतरच पाणी पुढे सरकून आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने त्या दृष्टीने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे लवकरच ही समस्या दूर होईल.

### नदीत आले फक्त चार इंच पाणी

**पुजारीटोला प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले. मात्र, बांधात पाणी अडत असून पाहिजे त्या प्रमाणात पाणी नदीत गेले नाही. फक्त चार इंच पाणीच नदीत वाढल्याची माहिती मिळाली. आता शहरासह कटंगी व कुडवा या गावांची तहान भागविण्यासाठी नदीत पाणी येणे गरजेचे असून, नाल्यावरील बांध फोडण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची धडपड सुरू आहे.**

# परशुराम जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तिरोडा :** अक्षय तृतीया दिनी ३० एप्रिल रोजी तिरोडा येथे संपुर्ण ब्राम्हण समाजाने भगवान परशुराम जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मीनारायण दुबे हे होते. दरम्यान ७५ वर्ष पुर्ण केलेल्या जेष्ठ व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. सविता दुबे आणि डॉ. स्मृती दुबे यांना ब्राह्मण समाजातील महिला डॉक्टर म्हणून सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. अजय शर्मा, प्रफुल्ल तिवारी, सुरेश उपाध्यक्ष, इंजी. देवेंद्र तिवारी, अमृत देशपांडे, कुलदीप शुक्ला, राजीव तिवारी, सुनिल जोशी, सोनाली देशपांडे, ममता दुबे, कल्याणसिंह राजपुरोहित, निकेश दुबे, अल्केश मिश्रा, अनिल गर्ग, मनोज चौबे, सौ. पिंकी चौबे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान परशुरामकर यांच्या छायाचित्राल्या माल्यापर्ण करून करण्यात आली. तसेच समाजाचे नवनियुक्त अध्यक्ष म्हणून राजीव तिवारी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मत मांडले.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले दरम्यान कु. संजीवनी तिवारी, कु. नीलांशी तिवारी, कु. गीत शुक्ला, कु. चिलबुल पांडे, कु. परी देशमुख, कु. समृद्धी तिवारी, कु. ऋषिता तिवारी यांनी नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार देवेंद्र तिवारी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजू मिश्रा, धनंजय शेलवते, गौरव फडणवीस, राहुल जोशी, मंगेश दुबे, प्रकाश सोनकवले, प्रणव रावत, पारस दुबे, कु. सोनाली सोनकवले, कु. विद्या जोशी, कु. राधा दुबे, कु. अवनी चौबे यांनी अथक परिश्रम घेतले.

# एप्रिल व मे महिन्यांच्या बिलासोबत स्वतंत्र बिल



**गोंदिया :** महावितरणच्या वीजग्राहकांना एप्रिल किंवा मे महिन्याच्या वीज बिलासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यासाठी स्वतंत्र बिल पाठविण्यात येत आहे. ही अतिरिक्त सुरक्षा ठेव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमांनुसार असून सर्व वीजग्राहकांनी या रकमेचा भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीजपुरवठा संहिता-२०२१ च्या विनियम १३.१ नुसार वीजग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारली जाते. या सुरक्षा ठेवीची दरवर्षी पुनर्गणना केली जाते. आर्थिक वर्ष संपल्यानंतर, मागील एका वर्षातील ग्राहकांच्या वीज वापराच्या सरासरीनुसार आणि विनियम १३.११ नुसार ग्राहकांनी भरलेल्या सुरक्षा ठेव रकमेवर रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित दरानुसार व्याज वीज बिलामध्ये समायोजित करून ग्राहकांना परत केले जाते. लघुदाब वीजग्राहकांना ही अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम घरबसल्या भरण्याची सोय महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाइटवर आणि महावितरणच्या मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या बिलाची रक्कम भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. ग्राहकांच्या सरासरी वीज वापराच्या आधारावर अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम निश्चित केली जाते. ज्या ग्राहकांचे मासिक बिल आहे, त्यांच्याकडून सरासरी मासिक बिलाच्या दुप्पट आणि ज्यांचे त्रैमासिक बिल आहे, त्यांच्याकडून सरासरी त्रैमासिक बिलाच्या दीडपट सुरक्षा ठेव घेण्याची तरतूद आयोगाने केली आहे. उदाहरणार्थ, जर एखाद्या ग्राहकाचा वार्षिक वीज वापर ६००० रुपये असेल, तर त्याला सरासरीनुसार दोन महिन्यांचे बिल म्हणजेच १००० रुपये सुरक्षा ठेव म्हणून महावितरणकडे भरणे बंधनकारक आहे. पुढील आर्थिक वर्षात जर या ग्राहकाचा वार्षिक वीज वापर ७२०० रुपये झाला, तर सूत्रानुसार आणि सरासरीप्रमाणे सुरक्षा ठेवीची रक्कम १२०० रुपये होईल. या परिस्थितीत, ग्राहकाचे पूर्वी जमा असलेले १००० रुपये वजा करून त्याला फक्त २०० रुपये अतिरिक्त भरावे लागतील. या अतिरिक्त सुरक्षा ठेव रकमेच्या भरण्यासाठी ग्राहकाला नियमित वीज बिलाव्यतिरिक्त स्वतंत्र बिल दिले जाते.

## प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री जोमात

**आमगाव :** राज्यात गुटखाबंदी कायदा लागू आहे. परंतु, गुटख्यासह सुगंधित पानमसाला, तंबाखूची दिवसाढवळ्या शहरांसह ग्रामीण भागात चहा, पानटपऱ्यांतून तसेच काही किराणा दुकानांतूनही विक्री होत आहे. इतकेच नव्हे तर उत्पादनावर संबंधित माहिती असणे गरजेचे असते. मात्र उत्पादक, नोंदणी आदींचा उल्लेख नसलेल्या गुटख्याचीही सर्रास विक्री होत आहे. एकंदर जिल्ह्यात गुटखाबंदी कायदा धाब्यावर बसविण्यात आल्याचे दिसून येत आहे. राज्य शासनाने गुटखाबंदी कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी अन्न व औषधी प्रशासन विभागासह पीएसआय दर्जाचे अधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, पोस्टमास्तर आदी २१ प्रकारच्या विभागप्रमुखांवर सोपविली आहे. परंतु, तरीही जिल्ह्यात गुटखाबंदी कायद्याची पायमल्ली होत आहे.

# गुरुदेव सुसंस्कार शिबिरातून दिला प्लास्टिक मुक्तीचा संदेश





**अर्जुनी मोरगाव :** अखिल भारतीय श्री. गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम, मोझरी यांच्या वतीने आरुषी पब्लिक स्कूल, नवेगावबांध येथे सात दिवसीय श्री गुरुदेव सुसंस्कार शिबिराचे आयोजन २५ एप्रिलपासून करण्यात आले होते. शिबिरात १२ ते १८ वयोगटातील ७५ विद्यार्थ्यांनी शिबिरात हिरहिरीने सहभाग घेत उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. दरम्यान २ मे रोजी शिबिराचे समारोह कार्यक्रमात प्लास्टिक मुक्तीचा संदेश देण्यात आले.

गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक रोहित तरोणे व त्यांच्या चमूने आरुषी पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली एकनाथ बोरकर यांच्या मार्गदर्शनात शिबिराचे आयोजन केले . शिबिराच्या सहाव्या दिवशी शिबिरार्थीनी नवेगावबांध पर्यटन संकुलाला भेट दिली. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यटन स्थळाची माहिती घेत आनंद लुटला. यात प्लास्टिक प्रदूषण या विषयावर मेश्राम यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्लास्टिक प्रतिबंधित क्षेत्राबाबत जनजागृती करण्यात आली. पोस्टर्स लावून प्लास्टिक बंदीचा संदेश देण्यातआला. शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गपूरक संस्कार आणि प्लास्टिकमुक्तीचे विचाराचे बीज पेरले जात आहे.असे प्रतिपादन संस्थेचे सचिव एकनाथ बोरकर यांनी केले. यावेळी माजी जि.प. सदस्य किशोर तरोणे, प्रगतशील शेतकरी यादवराव तरोणे, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा तरोणे, रामदास बोरकर तसेच आरुषी पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे संपूर्ण शिक्षकवर्ग, आणि प्रशिक्षणार्थी गुरुजी उपस्थित होते.

# राज्य अंगणवाडी बाल कर्मचारी युनियनची सभा उत्साहात



**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य अगनंवाडी बाल कर्मचारी युनियन आयटक गोंदिया जिल्हा कार्यकारिणी सभा १ मे रोजी भोजराज रामटेके भवन पाल चौक येथे जिवनकला वैध याच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मजदूर दिवस व महाराष्ट्र दिवस बाबत मिलींद गणवीर यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी आयटकचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले यांनी २० मे ला देश व्यापी संप आणि सरकारचे कामगार विरोधी धोरणा वर टिका करत सर्व अंगणवाडी सेविका, मदतनिस यांना आयोजित संपात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी राज्य सचिव विठा पवार, प्रणिता रंगारी, लालेश्वरी शरणागत, बिरजूला तिडके, अनिता , पुष्पा भगत, पंचशिला शहारे, अनिता झिगरे, लता बरेकर, शामकला मसराम, अर्चना मेश्राम, मिनाछी पटले, किरन ठवरे, मिनाछी राऊत, छाया सुनिता मडावी प्रामुख्याने उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य अगनंवाडी बाल कर्मचारी युनियन आयटक च्या वतीने सेविका मदतनिस याणी संगठन मजबूत करन्या चे अव्हान जिव वैध यांनी केले.

# जातनिहाय जनगणनाच्या निर्णयाचे स्वागत



**सालेकसा :** जातनिहाय जनगणना करण्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय केंद्र सरकारने बुधवारी घेतला. पुढील जनगणनेत ही प्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात येईल. उल्लेखनीय असे की, काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी जातनिहाय जनगणना व्हावी, अशी मागणी केली होती. दरम्यान केंद्र सरकारने जनगनणा करण्याची घोषणा केल्याने सालेकसा येथे भाजपच्या वतीने जल्लोष करून आतिषबाजी करीत निर्णयाचे स्वागत करण्यात आले.

पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. जातिनिहाय जनगणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह असून सामाजिक न्यायाच्या संकल्पनेस गती देणारा आहे. या जनगणनेतून मिळणाऱ्या आकडेवारीच्या आधारे, समाजातील ज्या गटाला कल्याणकारी योजनांची जास्त गरज आहे, त्यांच्यापर्यंत सरकार या योजना पोहचवू शकेल. सामाजिक लोकशाही मजबूत होईल, आणि लोकांना लोकशाहीने दिलेल्या त्यांच्या हक्काचा न्याय्य वाटा मिळेल. तसेच आजवर ज्या जातींची गणना होऊ शकली नाही आणि योग्य लोकसंख्या समोर येऊ शकली नाही त्यांची योग्य संख्या स्पष्ट झाल्यास त्यांना लोकप्रतिनिधित्व करून त्यांच्या मागण्या देखील मांडता येणार आहे.

यावेळी तालुका अध्यक्ष देवराम चुटे, गुमानसिंग उपराडे, अनुसूचित जाती जिल्हा महामंत्री राजेंद्र बडोले, भाजपा महामंत्री रामदास हत्तीमारे, भाजपा जिल्हा महिला महामंत्री सौ. प्रतिभाताई परिहार, कामगार आघाडी अध्यक्ष गादीप्रसाद भगत, खुशालराव शिवणकर, गुनाराम मेहर, पं.स. सदस्यां सौ.संगीता शहारे, महिला महामंत्री सौ. कविता येटरे, विनोद जैन, प्रेमलाल ठाकरे, युवा मोर्चा निलेश उपराडे, राज सुलाखे, कृष्णा कुरंजेकर, विजय जैतवार, बाबा परिहार, येटरे गुरुजी, नितीन शिवणकर, कार्तिक पटले, शामराव भांडारकर, बबलू श्रीवास्तव,व अनेक भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते होते.

# अनिसची नवेगावबांध शाखेची कार्यकारिणी गठीत



**नवेगावबांध :** जिल्हा परिषद विद्यालयात २९ एप्रिल रोजी डॉ.नरेंद्र दाभोळकर प्रणित महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीची अंधश्रद्धा प्रश्नचिन्ह व पूर्णविराम बाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दरम्यान नवेगावबांध शाखा समितीचे नवीन कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यात अध्यक्षपदी रविंद्रकुमार दहिवले व इतर सहकारी पदाधिकाऱ्यांची निवड करून कार्यकारिणी गठीत करण्यात आली.

यावेळी हरीचंद्र लाडे यांचे पुढाकाराने व महाराष्ट्र राज्य अनिसचे कार्यकर्ते विष्णुदास लोणारे यानी वैज्ञानिक प्रयोग सादर करून, प्रा.डॉ.युवराज खोब्रागडे यांनी अंधश्रद्धा प्रश्नचिन्ह व पूर्णविराम यावर सखोल मार्गदर्शन केले. दरम्यान नवेगावबांध शाखेची कार्यकारिणई गठीत करण्यात आली. तसेच या बाबातची माहिती पोनि. चाफले मॅडम यांना देण्यात आली. त्याप्रसंगी समिती कार्याध्यक्ष रामलाल गंगाबाई विठोबा लांजेवार यांचेकडून त्यांचा मागील ३१ वर्षापासून सुरू असलेल्या ऐच्छिक व निस्वार्थी ग्रंथदान, फोटो/प्रतिमा दान उपक्रमाअंतर्गत स्मृतिषेश आई बाबांचे स्मरणार्थ पोलिस स्टेशन नवेगाव/बांधचे वाचनालयास काही ग्रंथ सस्नेह भेट देण्यात आले. त्याप्रसंगी दुनेदार साहेब पो.ऊ.नि. व इतर सहकारी पोलिस कर्मचारी व समिती अध्यक्ष रवींद्रकुमार दहिवले,कार्याध्यक्ष रामलाल लांजेवार व प्रधान सचिव हरिचंद्र लाडे उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परिक्षेत दक्ष रहांगडालेचे सुयश

## प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सत्कार



**तिरोडा :** तालुक्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय नवेझरी येथील शिक्षण घेणाऱ्या दक्ष गौरीशंकर रहांगडाले या शेतकऱ्याच्या मुलाने नुकतीच घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५ मध्ये घवघववित यश संपादन केल्याने दक्ष शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे. प्रहार जनशक्ती जिल्हा कार्यालय नवेझरी येथे दक्ष रहांगडाले यांचा पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर, दक्षचे वडिल गौरीशंकर रहांगडाले, गोपाळ शेंडे, कमल सोनटक्के, प्रमोद मंदुरकर,संतोष भांडारकर, आशिष बेलपाडे, समिर मेश्राम आदी उपस्थित होते.

# त्या 32 बेघर झालेल्या कुटूंबांना मिळणार घरकुल

### आमदार विनोद अग्रवाल यांचा पाठपुरावा



**गोंदिया :** शहरातील डॉ. आंबेडकर वॉर्डमध्ये रेल्वे लाईनलगत नगर परिषदेच्या जागेवर गेल्या ३० वर्षांपासून झोपड्या बांधून राहत असलेल्या गरीब कुटुंबांच्या ३२ झोपड्या रेल्वे प्रशासनाने दोन वर्षांपूर्वी विकासकामांसाठी तोडल्या होत्या. त्यामुळे ही कुटुंब बेघर झाली होती. ही कुटुंबं आर्थिक दृष्ट्या कमकुवत असल्यामुळे माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते घनश्याम पानतवने यांनी १६ कुटुंबांसाठी स्वतःच्या खर्चाने प्लॉट खरेदी करून दिले, तर उर्वरित १६ कुटुंबांना अत्यंत कमी दरात प्लॉट उपलब्ध करून देण्यात आले.

या प्लॉटवर घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी या बेघर कुटुंबांनी एक वर्षापूर्वी अर्ज दाखल केले होते. मात्र काही कारणास्तव सर्व अर्ज रद्द करण्यात आले होते.या बाबतची माहिती आमदार विनोद अग्रवाल यांच्याकडे पोहोचताच त्यांनी तात्काळ २ मे रोजी कारवाई करत समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे, अपर तहसीलदार श्रीकांत कांबळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर वॉर्ड येथे–बुलावून घेतले. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन बेघर कुटुंबांशी संवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि सर्व ३२ कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ लवकरच मिळवून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या कार्यवाही तात्काळ करण्याचे निर्देशही दिले. या भेटीत घनश्याम पानतवने, बंटी पंचबुद्धे, व सामाजिक कार्यकर्ते अमित भालेराव देखील उपस्थित होते.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
मालक, मुद्रक, प्रकाशक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. संपादक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-सुरेश लक्ष्मण कोटगले, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# ट्रम्प उघडणार अमेरिकेतील सर्वात धोकादायक तुरुंग

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अल्काट्राझ तुरुंग पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर म्हटले की, सर्वात धोकादायक गुन्हेगारांना येथे ठेवतील. ट्रम्प म्हणाले की त्यांनी न्याय विभाग, एफबीआय आणि होमलँड सिक्युरिटीला अल्काट्राझची पुनर्बांधणी करण्यासाठी एकत्र काम करण्याचे आदेश दिले आहेत.

ट्रम्प म्हणाले की अल्काट्राझ पुन्हा उघडणे म्हणजे खऱ्या अर्थाने कायदा आणि सुव्यवस्था पुनर्संचयित करणे. अमेरिकेने अलीकडेच मध्य अमेरिकन देश एल साल्वाडोरसोबत हिंसक गुन्हेगार आणि बेकायदेशीर स्थलांतरितांना आश्रय देण्यासाठी करार केला आहे.

देशात धोकादायक गुन्हेगारांना ठेवणे ही एक गरज बनली आहे, अनेक 'बदमाश न्यायाधीश' वारंवार कैद्यांना त्यांच्या खटल्यांच्या सुनावणीदरम्यान उपस्थित राहण्यास बोलावतात. यामुळे देशावरील भार वाढतो, असेही ते म्हणाले.

अल्काट्राझ हे अमेरिकेतील सर्वात कठीण तुरुंगांपैकी एक मानले जात असे, जिथे सर्वात धोकादायक कैद्यांना ठेवले जात असे. त्याला 'द रॉक' असेही म्हणतात. हे कॅलिफोर्नियातील सॅन फ्रान्सिस्को खाडीतील एका बेटावर आहे. हे तुरुंग १९३४ ते १९६३ पर्यंत वापरात होते. जास्त खर्च आणि देखभालीच्या समस्यांमुळे ते बंद करण्यात आले.

या तुरुंगात इटालियन-अमेरिकन माफिया डॉन अल कॅपोन, कुख्यात गुंड जॉर्ज 'मशीन गन' केली, रॉबर्ट स्ट्राउड होते. या तुरुंगात असताना, स्ट्राउडने पक्ष्यांवर 'डायजेस्ट ऑन द डिसीजेस ऑफ बर्ड्स' हे त्यांचे अतिशय लोकप्रिय पुस्तक लिहिले. यानंतर त्याला 'बर्डमॅन ऑफ अल्काट्राझ' असे नाव देण्यात आले.

येथे कैद्यांना कडक देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. त्यांना एकमेकांशी बोलण्याची परवानगी नव्हती. अनेक कैद्यांना महिनोनमहिने एका अंधाऱ्या खोलीत एकटे ठेवण्यात आले. यामुळे तिथे राहणाऱ्या कैद्यांना मानसिक आजार जडले. तुरुंगात अनेक लोकांनी आत्महत्या केल्या.

**तुरुंगातून पळून जाण्याची सर्वात प्रसिद्ध कहाणी**

अनेक कैद्यांनी तुरुंगातून पळून जाण्याचा प्रयत्न केला, त्यापैकी बहुतेकांना मारण्यात आले किंवा पकडण्यात आले. अल्काट्राझमधून सर्वात प्रसिद्ध पलायन ११ जून १९६२ रोजी घडले. फ्रँक मॉरिस, जॉन अँग्लिन आणि क्लेरेन्स अँग्लिन तुरुंगातून पळून गेले.

या कैद्यांच्या पळून जाण्याची कहाणी १९६० मध्ये सुरू झाली जेव्हा फ्रँक मॉरिस नावाच्या कैद्याला तुरुंगात आणण्यात आले. त्याने तुरुंगातील इतर तीन कैद्यांशी मैत्री केली: जॉन अँग्लिन, क्लेरेन्स अँग्लिन आणि ॲलन वेस्ट. डिसेंबर १९६१ मध्ये या चौघांनी तुरुंगातून पळून जाण्याचा कट रचला.





खरं तर, त्याने पाहिले की तुरुंगाच्या खोलीच्या वायुवीजनात एक जाळी होती जिथून बाहेर पडता येत असे. हे तुरुंग एका बेटावर बांधले गेले होते. जास्त आर्द्रतेमुळे सिमेंट कमकुवत होईल ज्यामुळे जाळी सहजपणे काढता येईल.

अल्काट्राझ तुरुंगातील एका कोठडीतील फोटो. हा फोटो २०१० चा आहे.

अल्काट्राझ तुरुंगातील एका कोठडीतील फोटो. हा फोटो २०१० चा आहे.

चमच्याने खोदकाम करून तुरुंगातून पळून गेला, रेनकोटपासून बनवली होडी

या चार कैद्यांनी चमच्याने आणि ड्रिलने त्यांच्या कोठडीत खोदकाम केले आणि वेंटिलेशन शाफ्टकडे मार्गक्रमण केले. पळून जाण्यासाठी त्यांनी चाळीसपेक्षा जास्त रेनकोट जोडून एक होडी बनवली. त्यांनी भाग जोडण्यासाठी गरम पाईपचा वापर केला. सुरक्षा कर्मचाऱ्यांना फसवण्यासाठी त्यांनी त्यांच्या पलंगावर कागद, केस आणि साबणापासून बनवलेले बनावट डोके ठेवले जेणेकरून ते झोपलेले दिसतील.

११ जूनच्या रात्री, कैदी त्यांच्या कोठडीत बांधलेल्या बोगद्यातून तुरुंगाच्या छतावर चढले आणि नंतर पाईप्स वापरून समुद्रकिनाऱ्यावर पोहोचले. तथापि, या कैद्यांपैकी एक, ॲलन वेस्ट, असे करू शकला नाही. असे म्हटले जाते की तो शेवटच्या क्षणी भिंतीवरील प्लास्टर काढू शकला नाही. यानंतर, त्याच्याशिवाय इतर सर्व कैदी तुरुंगातून पळून गेले.

त्याने त्याच्या रेनकोटपासून बनवलेली बोट पाण्यात सोडली आणि समुद्र ओलांडण्याचा प्रयत्न केला. तथापि, तो हे करू शकला की नाही, हे आजपर्यंत कोणालाही कळू शकलेले नाही. त्याचे कोणतेही मृतदेह सापडले नाहीत.

एफबीआयच्या अहवालात असा दावा करण्यात आला आहे की त्यांची बोट समुद्रात बुडाली असावी. पण तिघांच्या नातेवाईकांनी सांगितले की ते फरार झाल्यानंतरही संपर्कात होते. घटनेच्या एका वर्षानंतर अल्काट्राझ बंद करण्यात आले. आता ते एक लोकप्रिय पर्यटन स्थळ बनले आहे. दरवर्षी सुमारे १२ लाख लोक ते पाहण्यासाठी येतात.

■ ■ ■

# लोककल्याणकारी राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज!



आज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०३ वी पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.

२६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर (करवीर) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले.

राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या.

शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली.

शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात.

शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला.

१९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले.

छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले.

त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे.

बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले.

जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे.

व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

●●●●



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# बांगलादेशची निवडणुकीकडे वाटचाल




बांगलादेशचे राजकारण हळूहळू निवडणुकांकडे वाटचाल करत आहे, जरी निवडणुकीची अधिकृत तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. देशाचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी संकेत दिले आहेत की या वर्षी डिसेंबरमध्ये किंवा पुढील वर्षी जानेवारीमध्ये निवडणुका होऊ शकतात.

शेख हसीना यांची अवामी लीग आणि खालेदा झिया यांची बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) सारखे पारंपारिक पक्ष त्यासाठी तयारीत व्यस्त आहेत. त्याच वेळी, विद्यार्थी चळवळीतून उदयास आलेला 'नॅशनल सिटीझन पार्टी' (एनसीपी) हा नवीन राजकीय पक्ष देखील एक महत्त्वाची शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करू लागला आहे. बीएनपी आणि जमात-ए-इस्लामीने सर्व ३०० जागा लढवण्याची तयारी दर्शवली आहे.

**हसीनांच्या पक्षावर बंदीची विद्यार्थ्यांची मागणी**

यावेळी बांगलादेशच्या राजकारणात विद्यार्थी संघटनांची भूमिका महत्त्वाची दिसते. राष्ट्रीय नागरिक पक्षाने महाविद्यालये आणि गावांमध्ये सक्रिय होऊन आपला ठसा उमटवण्यास सुरुवात केली आहे.

एनसीपीने स्पष्ट केले आहे की जोपर्यंत अवामी लीगवर बंदी घातली जात नाही आणि निवडणूक सुधारणा राबवल्या जात नाहीत तोपर्यंत ते या निवडणुकीला मान्यता देणार नाही. तळागाळातील संघटनात्मक रचना मजबूत करण्यासाठी, एनसीपी सतत बैठका घेत आहे आणि कट्टरपंथी धार्मिक पक्षांशी युती देखील करत आहे.

दक्षिणेकडील प्रदेशातील प्रमुख संघटक हसनत अब्दुल्ला यांच्या मते, "सुधारणा आणि अवामी लीगवर बंदी घातल्याशिवाय निवडणुका होऊ शकत नाहीत. आम्ही दोन्ही ध्येयांवर समांतरपणे काम करत आहोत." एनसीपीच्या या भूमिकेचा परिणाम आगामी निवडणुकांमधील राजकीय समीकरणांवर होऊ शकतो.

**अवामी लीगला उमेदवारांच्या हत्येची भीती**

अवामी लीग देखील निवडणुकीची तयारी करत आहे. परंतु पक्षाच्या वरिष्ठ नेत्या आणि माजी पंतप्रधान शेख हसीना भारताला गेल्यापासून पक्षाला नेतृत्वाच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. पक्षाला बंदी येण्याची भीती आहे.

पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मते, सर्व ३०० जागांसाठी पयार्यी उमेदवारांची यादी तयार करण्यात आली आहे. तथापि, पक्ष नेत्यांच्या हत्या आणि अटकेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

संघटनेच्या एका वरिष्ठ नेत्याच्या मते, निष्पक्ष निवडणुका झाल्यास पक्ष परीक्षेला तोंड देण्यास तयार आहे. परंतु सध्याच्या सरकारच्या हेतूंबद्दल शंका कायम आहेत, ज्यामुळे पक्षाची रणनीती आव्हानात्मक बनली आहे.

**बीएनपीच्या सभा पुन्हा सुरू**

खालिदा यांच्या बीएनपीने सर्व ३०० जागा लढवण्याचा दावा केला आहे. पक्षाची विद्यार्थी संघटना विद्यापीठ परिसरात सक्रिय आहे आणि वारंवार बैठका घेते. बीएनपीच्या प्रवक्त्या फरजाना शर्मीन पुतुल यांच्या मते, पक्ष निवडणुकीसाठी मानसिकदृष्ट्या तयार आहे. तथापि, पक्षावर निधी संकलन आणि तळागाळातील राजकीय प्रभावाचा आरोप आहे.

पक्षाचे संभाव्य नेते तारिक रहमान यांच्या परतण्याबाबत गोंधळ आहे, ज्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये निराशा पसरली आहे. पक्षाचे सरचिटणीस मिर्झा फखरुल आणि रुहुल कबीर रिझवी यांनी सध्याच्या सरकारच्या अंतर्गत निष्पक्ष निवडणुकांबद्दल शंका व्यक्त केली आहे.

एकूणच काय तर बांगला देशमध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागले असून, प्रमुख राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. मात्र अस्थिरता कायम आहे.

■ ■ ■

# अन्यथा मार्ग मोकळा...!



महायुतीमध्ये रोजच खटके उडताना दिसून येत आहे. भाजपचे मंत्री अतुल सावे यांनी शिवसेना आमदाराला झापले आहे. आमच्याकडे 237 आमदार आहे, ज्यांना युतीत राहायचंय त्यांनी राहावे, नाही तर बाहेर पडावे अशा शब्दात बाबुराव कदम कोहळीकर यांना सुनावले आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी नांदेड जिल्ह्यात तांडावस्ती योजनेचा निधी आमदारांना विश्वासात न घेता परस्पर वाटप केल्याच्या आरोपावरून शिंदेसेनेचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी चक्क पालकमंत्री अतुल सावे यांच्या दौऱ्यात कार्यकर्त्यांसह निषेध करण्याचा इशारा दिला.

**नेमके सावे काय म्हणाले?**

अतुल सावे म्हणाले की, मी आमदारांच्या नाराजीची खूप काळजी करत नाही. आमच्याकडे 237 आमदार आहेत, आम्ही युतीत काम करतोय, ज्याला युतीत राहायचंय त्यांनी राहावे, ज्यांना नाही राहायचे, त्यांनी बाहेर पडावे.

सावे म्हणाले की, तांडावस्तीचा प्रस्ताव हा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आला होता, असे सांगितले. आमदारांनी शिफारस केल्यानंतरच हा प्रस्ताव माझ्याकडे आला. त्यानंतर तो मंजूर करण्यात आला. यासंदर्भात तक्रार आल्यानंतर त्या प्रस्तावाला स्थगिती देण्यात आली असल्याची सारवासारव सावे यांनी केली.

**साडेसात कोटींची कामे स्थगित**

जिल्ह्यातील तांडावस्तीची कामे देताना स्थानिक आमदारांना विश्वासात घेण्यातआले नाही, अशी तक्रार भाजपचे आमदार तुषार राठोड, शिंदे गटाचे बाबूराव कदम, भीमराव केराम आदींनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती.

या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्री अतुल सावे यांनी मंजूर केलेली 7.35 कोटींची कामे स्थगित केली. मुख्यमंत्र्यांनी दणका दिल्यानंतर पालकमंत्री अतुल सावे हे नांदेडात नियोजन समितीच्या बैठकीचा आढावा घेण्यासाठी आले होते, त्यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी हे म्हटले आहे.

**राज्यमंत्री बोर्डीकरांची नाराजी**

मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, माझ्या मतदारसंघात विकासकामं व्हावीत, तांडा वस्तीचा निधी मिळावा, यासाठी शिफारस केली होती. तशी मागणी केली होती. पण त्यातील एकही काम झाले नाही. पण दुसऱ्यांना ही कामे दिली गेलेली आहेत. माझ्या मतदारसंघात कामे होत असताना माझी कोणत्याही प्रकारची शिफारस घेतली गेलेली नाही, अशी नाराजी बोर्डिकरांनी व्यक्त केली आहे. ■ ■ ■

## शास्त्रानुसार देवघराची रचना!

**वाचक लिहितात**

घरातील अत्यंत पवित्र स्थान, जिथे सकारात्मक ऊर्जा सर्वाधिक असते, ते म्हणजे देवघर! देवघर हे भक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. दररोज भक्तिभावाने पूजा केल्यास भगवंताप्रती भावजागृती निर्माण होते, मानसिक शांतता लाभते आणि आध्यात्मिक प्रगती होण्यास मदत होते. तेव्हा देवघराची रचना शास्त्रोक्त पद्धतीने कशी असावी, हे थोडक्यात पाहू या.

ईशान्य (उत्तर-पूर्व) कोपरा देवघरासाठी सर्वोत्तम मानला जातो. कारण बृहस्पती हे ईशान्य दिशेचे स्वामी आहेत. जर हे शक्य नसेल, तर पूर्व किंवा उत्तर दिशेला देवघर ठेवता येते.

देवघर थेट फरशीवर ठेवू नये. ते संगमरवरी किंवा लाकडाचे बनलेले असावे. देव्हाऱ्यात देवतांची मांडणी करताना ती शंकूच्या आकारात करायला हवी. शंकूच्या टोकावर, म्हणजेच मध्यभागी, श्री गणपतीचे चित्र किंवा मूर्ती ठेवावी. पूजा करणाऱ्याच्या उजव्या हाताला स्त्रीदेवता आणि डाव्या हाताला पुरुषदेवता ठेवाव्यात. देवतांची संख्या अधिक म्हणजे ईश्वरी तत्त्व अधिक, असे मुळीच नाही. देवघराची रचना जर शास्त्रानुसार केलेली असेल, तर निश्चितच सकारात्मक ऊर्जा वाढण्यास मदत होते.

वरील शास्त्रशुद्ध माहिती मला सनातन संस्थेच्या "देवघर आणि पूजेतील उपकरणे" या ग्रंथात वाचायला मिळाली. या माहितीनुसार देवघराची रचना केल्यानंतर घरात सात्त्विकतेचे प्रमाण वाढले आहे. आपणही याचा लाभ घेतल्यास निश्चितच पूजेतील आनंद द्विगुणित होऊन आत्मिक शांतता लाभेल!

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

# हात-पाय चेहऱ्यावरील टॅनिग दुर करण्यासाठी हळदीचा उपाय एकदम खास

प्रत्येकांच्या स्वयंपाकघरात जेवण बनवताना हळद वापरली जाते. हळद केवळ अन्नाचा रंग योग्य ठेवत नाही तर आरोग्य देखील चांगले ठेवते. याशिवाय हळदीमध्ये असलेले घटक त्वचेचा रंग सुधारण्यापासून ते मुरुमे काढून टाकणे, त्वचेची जळजळ कमी करणे इत्यादी अनेक प्रकारे फायदेशीर आहेत.

उन्हाळ्यात बहुतेक लोकांना सन टॅन होण्याची समस्या भेडसावते. यामुळे त्वचेचा रंग खूप गडद दिसू लागतो आणि कधीकधी काही ठिकाणी त्वचा काळी आणि काही ठिकाणी हलकी अशी दिसत असते. या समस्येपासून सुटका मिळविण्यासाठी तुम्ही हळदीचा एक सोपा उपाय वापरून पाहू शकता.

सन टॅन टाळण्यासाठी लोकं सनस्क्रीन लोशन वापरण्यापासून ते कॉटनच्या कापडाने चेहरा झाकण्यापर्यंत अनेक पद्धती अवलंब करतात. अतिनील किरणांमुळे त्वचेचे नुकसान होऊ नये म्हणून, सनस्क्रीन लावणे आवश्यक आहे. टॅनिंग झालेली त्वचा पुन्हा चमकदार करण्यासाठी हळदीचा हा प्रभावी उपाय करता येईल.



प्रथम एक चमचा हळद घ्या आणि तिचा रंग बदलेपर्यंत ती कोरडी भाजून घ्या. यानंतर एका भांड्यात हळद काढा आणि त्यात अर्धा चमचा कॉफी टाका. यानंतर यामध्ये मध टाकून पेस्ट तयार करा. आता टॅनिंग रिमूव्ह हळदीचा फेसपॅक तयार आहे.

हळद, कॉफी आणि मधाची तयार केलेली पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लावा. यानंतर, ते किमान 15 मिनिटे तसेच राहू द्या. जेव्हा फेसपॅक जवळजवळ सुकत आलेला आहे असे जाणवल्यास तेव्हा टोमॅटो अर्धा कापून घ्या आणि तो गोलाकार हालचालीत चेहऱ्यावर हलक्या हातानी स्क्रब करा. थोडा वेळ मसाज करा. कमीत कमी 5 मिनिटांनी ओल्या स्पंजने चेहरा स्वच्छ करा. आठवड्यातून दोनदा हा उपाय करा. हात आणि पायांवरून टॅनिंग काढण्यासाठी देखील याचा वापर करू शकता, ज्यामध्ये तुम्ही टोमॅटोवर थोडासा लिंबाचा रस टाका आणि तो हात आणि पायांवर चोळा. जर मध तुमच्या त्वचेला सूट करत नसेल तर त्याऐवजी आंबट दहीचा वापर करा.

जर हळद, कॉफी, मध आणि टोमॅटोचा हा उपाय योग्यरित्या केल्यास टॅनिंग दूर करण्यासोबतच त्वचेचे छिद्रही घट्ट होतील आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येईल. यासोबतच रंगही चांगला होईल. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## सिंहासन..!

बाटली बदलली
मदीरा तीच आहे..
पक्ष बदलले
चेहरे तेच आहे..

शासक बदलेले
धोरण तेच आहे ..
उदिष्ट सर्वांचे
'खुर्ची ' हेच आहे..!
खुर्ची हेच आहे ..!

महासागर भंडारा
मंगळवार ०६ मे २०२५
पान ६

# वाळवणावर पडले अवकाळीचे विरजण

**गोंदिया :** उन्हाळ्याची चाहूल लागताच म्हणजेच मार्च महिन्यापासून गृहिणी वाळवणाचे विविध खाद्यपदार्थ तयार करण्यास सुरुवात करतात. आता ऊन चांगले तापत असून घरोघरी सध्या वाळवणाचे पदार्थ तयार केले जात आहेत. मात्र, पंधरवड्यापासून सुरू असलेले ढगाळ वातारवण व पावसाच्या खेळामुळे महिलांचे नियोजन विस्कटत असून कित्येकांचे तर पावसाने नुकसान केले आहे.

गत काही वर्षांपासून महागाईने चांगलाच जोर धरला आहे. जणू काही देशात महागाईचा आगडोंब उसळला आहे. यात सर्वसामान्य माणूस होरपळला जात आहे. उन्हाळ्यात गृहिणी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करून वर्षभर साठवून ठेवतात; पण महागाईने कळस गाठल्याने वाळवणाचे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांची खरेदी करताना गृहिणींची दमझाक होत आहे. उन्हाळ्यात शेवया, सरगुंडे, साध्या कुरडया, रंगबेरंगी फुलासारख्या कुरड्या, पापड, वड्या, आलू चिप्स, लोणचे आदी खाद्यपदार्थ तयार केले जातात; पण हे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी किमान दिवसभर कडक ऊन तापणे गरजेचे असते; पण सध्या दिवसभर कडक ऊन राहीलच, याची शाश्वती नाही. सकाळी जरी ऊन तापले तरी लगेच दुपारी ढगाळ वातावरण निर्माण होते. पाऊस बरसण्याची शक्यता असते.

# तेढवा नाल्यातील बंधाऱ्यात अडले पुजारीटोलाचे पाणी

## शहरातील पाणीटंचाई प्रश्न होऊ लागला गंभीर



**गोंदिया :** शहरासह लगतच्या कुडवा व कटंगी या दोन गावांची तहान भागविणारी वैनगंगा नदी यंदा कोरडी पडल्याने पुजारीटोला प्रकल्पातून पाणी आणण्याची पाळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर आली आहे. यामुळे पुजारीटोला प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले आहे. मात्र, तेढवा गावाजवळील नाल्यातील बंधाऱ्यामध्ये पाणी अडून पडले आहे. अशात आता हे बंधारे तोडण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची धडपड सुरू असून, हे बंधारे तोडल्यानंतरच पाणी पुढे जाऊन वैनगंगेला मिळणार आहे.

यंदा वैनगंगा नदीने साथ सोडल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणला पुजारीटोला प्रकल्पाचे पाणी मागविण्याची पाळी आली. यानुसार, २५ एप्रिल रोजी पुजारीटोला प्रकल्पातून वैनगंगा नदीसाठी पाणी सोडण्यात आले आहे. पुजारीटोलाचे पाणी काटी गावाजवळील तेढवा या गावाजवळून जाणाऱ्या नाल्यात घेण्यात आले आहे. मात्र, या नाल्यावर पाणी अडवून ठेवण्यासाठी आठ बंधारे तयार करण्यात आले आहेत. पुजारीटोला येथून सोडलेले पाणी या बांधांमध्ये अडून पडल्याने पुढे सरकत नसल्याने नदीत थोडकेच पाणी आल्याची माहिती मिळाली.

अशात आता हे बंधारा फोडणे गरजेचे असून, त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून जिल्हा परिषद सिंचन विभागाला पत्र देण्यात आले आहे. त्यानंतर त्यांच्या कनिष्ठ अभियंत्यांनी सोमवारी (दि.२) संबंधित नाला व त्यावरील बंधाऱ्याची पाहणी केल्याची माहिती मिळाली. पुजारीटोलाचे पाणी पुढे जावे, यासाठी हे आठही बंधारे काही प्रमाणात फोडणे गरजेचे असून, त्यासाठी जिल्हा परिषद सिंचन विभागाची परवानगी गरजेची आहे. अशात आता हे बांध फुटल्यानंतरच पाणी पुढे सरकून आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने त्या दृष्टीने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे लवकरच ही समस्या दूर होईल.

## नदीत आले फक्त चार इंच पाणी

**पुजारीटोला प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले. मात्र, बांधात पाणी अडत असून पाहिजे त्या प्रमाणात पाणी नदीत गेले नाही. फक्त चार इंच पाणीच नदीत वाढल्याची माहिती मिळाली. आता शहरासह कटंगी व कुडवा या गावांची तहान भागविण्यासाठी नदीत पाणी येणे गरजेचे असून, नाल्यावरील बांध फोडण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची धडपड सुरू आहे.**

# परशुराम जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**तिरोडा :** अक्षय तृतीया दिनी ३० एप्रिल रोजी तिरोडा येथे संपुर्ण ब्राम्हण समाजाने भगवान परशुराम जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मीनारायण दुबे हे होते. दरम्यान ७५ वर्ष पुर्ण केलेल्या जेष्ठ व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. सविता दुबे आणि डॉ. स्मृती दुबे यांना ब्राह्मण समाजातील महिला डॉक्टर म्हणून सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. अजय शर्मा, प्रफुल्ल तिवारी, सुरेश उपाध्यक्ष, इंजी. देवेंद्र तिवारी, अमृत देशपांडे, कुलदीप शुक्ला, राजीव तिवारी, सुनिल जोशी, सोनाली देशपांडे, ममता दुबे, कल्याणसिंह राजपुरोहित, निकेश दुबे, अल्केश मिश्रा, अनिल गर्ग, मनोज चौबे, सौ. पिंकी चौबे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान परशुरामकर यांच्या छायाचित्राल्या माल्यापर्ण करून करण्यात आली. तसेच समाजाचे नवनियुक्त अध्यक्ष म्हणून राजीव तिवारी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मत मांडले.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले दरम्यान कु. संजीवनी तिवारी, कु. नीलांशी तिवारी, कु. गीत शुक्ला, कु. चिलबुल पांडे, कु. परी देशमुख, कु. समृद्धी तिवारी, कु. ऋषिता तिवारी यांनी नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार देवेंद्र तिवारी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजू मिश्रा, धनंजय शेलवते, गौरव फडणवीस, राहुल जोशी, मंगेश दुबे, प्रकाश सोनकवले, प्रणव रावत, पारस दुबे, कु. सोनाली सोनकवले, कु. विद्या जोशी, कु. राधा दुबे, कु. अवनी चौबे यांनी अथक परिश्रम घेतले.

# एप्रिल व मे महिन्यांच्या बिलासोबत स्वतंत्र बिल



**गोंदिया :** महावितरणच्या वीजग्राहकांना एप्रिल किंवा मे महिन्याच्या वीज बिलासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यासाठी स्वतंत्र बिल पाठविण्यात येत आहे. ही अतिरिक्त सुरक्षा ठेव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमांनुसार असून सर्व वीजग्राहकांनी या रकमेचा भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीजपुरवठा संहिता-२०२१ च्या विनियम १३.१ नुसार वीजग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारली जाते. या सुरक्षा ठेवीची दरवर्षी पुनर्गणना केली जाते. आर्थिक वर्ष संपल्यानंतर, मागील एका वर्षातील ग्राहकांच्या वीज वापराच्या सरासरीनुसार आणि विनियम १३.११ नुसार ग्राहकांनी भरलेल्या सुरक्षा ठेव रकमेवर रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित दरानुसार व्याज वीज बिलामध्ये समायोजित करून ग्राहकांना परत केले जाते. लघुदाब वीजग्राहकांना ही अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम घरबसल्या भरण्याची सोय महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाइटवर आणि महावितरणच्या मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या बिलाची रक्कम भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. ग्राहकांच्या सरासरी वीज वापराच्या आधारावर अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम निश्चित केली जाते. ज्या ग्राहकांचे मासिक बिल आहे, त्यांच्याकडून सरासरी मासिक बिलाच्या दुप्पट आणि ज्यांचे त्रैमासिक बिल आहे, त्यांच्याकडून सरासरी त्रैमासिक बिलाच्या दीडपट सुरक्षा ठेव घेण्याची तरतूद आयोगाने केली आहे. उदाहरणार्थ, जर एखाद्या ग्राहकाचा वार्षिक वीज वापर ६००० रुपये असेल, तर त्याला सरासरीनुसार दोन महिन्यांचे बिल म्हणजेच १००० रुपये सुरक्षा ठेव म्हणून महावितरणकडे भरणे बंधनकारक आहे. पुढील आर्थिक वर्षात जर या ग्राहकाचा वार्षिक वीज वापर ७२०० रुपये झाला, तर सूत्रानुसार आणि सरासरीप्रमाणे सुरक्षा ठेवीची रक्कम १२०० रुपये होईल. या परिस्थितीत, ग्राहकाचे पूर्वी जमा असलेले १००० रुपये वजा करून त्याला फक्त २०० रुपये अतिरिक्त भरावे लागतील. या अतिरिक्त सुरक्षा ठेव रकमेच्या भरण्यासाठी ग्राहकाला नियमित वीज बिलाव्यतिरिक्त स्वतंत्र बिल दिले जाते.

## प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री जोमात

**आमगाव :** राज्यात गुटखाबंदी कायदा लागू आहे. परंतु, गुटख्यासह सुगंधित पानमसाला, तंबाखूची दिवसाढवळ्या शहरांसह ग्रामीण भागात चहा, पानटपऱ्यांतून तसेच काही किराणा दुकानांतूनही विक्री होत आहे. इतकेच नव्हे तर उत्पादनावर संबंधित माहिती असणे गरजेचे असते. मात्र उत्पादक, नोंदणी आदींचा उल्लेख नसलेल्या गुटख्याचीही सर्रास विक्री होत आहे. एकंदर जिल्ह्यात गुटखाबंदी कायदा धाब्यावर बसविण्यात आल्याचे दिसून येत आहे. राज्य शासनाने गुटखाबंदी कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी अन्न व औषधी प्रशासन विभागासह पीएसआय दर्जाचे अधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, पोस्टमास्तर आदी २१ प्रकारच्या विभागप्रमुखांवर सोपविली आहे. परंतु, तरीही जिल्ह्यात गुटखाबंदी कायद्याची पायमल्ली होत आहे.

# गुरुदेव सुसंस्कार शिबिरातून दिला प्लास्टिक मुक्तीचा संदेश





**अर्जुनी मोरगाव :** अखिल भारतीय श्री. गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम, मोझरी यांच्या वतीने आरुषी पब्लिक स्कूल, नवेगावबांध येथे सात दिवसीय श्री गुरुदेव सुसंस्कार शिबिराचे आयोजन २५ एप्रिलपासून करण्यात आले होते. शिबिरात १२ ते १८ वयोगटातील ७५ विद्यार्थ्यांनी शिबिरात हिरहिरीने सहभाग घेत उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. दरम्यान २ मे रोजी शिबिराचे समारोह कार्यक्रमात प्लास्टिक मुक्तीचा संदेश देण्यात आले.

गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक रोहित तरोणे व त्यांच्या चमूने आरुषी पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली एकनाथ बोरकर यांच्या मार्गदर्शनात शिबिराचे आयोजन केले . शिबिराच्या सहाव्या दिवशी शिबिरार्थींनी नवेगावबांध पर्यटन संकुलाला भेट दिली. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यटन स्थळाची माहिती घेत आनंद लुटला. यात प्लास्टिक प्रदूषण या विषयावर मेश्राम यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्लास्टिक प्रतिबंधित क्षेत्राबाबत जनजागृती करण्यात आली. पोस्टर्स लावून प्लास्टिक बंदीचा संदेश देण्यातआला. शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गपूरक संस्कार आणि प्लास्टिकमुक्तीचे विचाराचे बीज पेरले जात आहे.असे प्रतिपादन संस्थेचे सचिव एकनाथ बोरकर यांनी केले. यावेळी माजी जि.प. सदस्य किशोर तरोणे, प्रगतशील शेतकरी यादवराव तरोणे, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा तरोणे, रामदास बोरकर तसेच आरुषी पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे संपूर्ण शिक्षकवर्ग, आणि प्रशिक्षणार्थी गुरुजी उपस्थित होते.

# राज्य अंगणवाडी बाल कर्मचारी युनियनची सभा उत्साहात




**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य अगनंवाडी बाल कर्मचारी युनियन आयटक गोदिया जिल्हा कार्यकारिणी सभा १ मे रोजी भोजराज रामटेके भवन पाल चौक येथे जिवनकला वैध याच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मजदूर दिवस व महाराष्ट्र दिवस बाबत मिलींद गणवीर यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी आयटकचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले यांनी २० मे ला देश व्यापी संप आणि सरकारचे कामगार विरोधी धोरणा वर टिका करत सर्व अंगणवाडी सेविका, मदतनिस यांना आयोजित संपात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी राज्य सचिव विठा पवार, प्रणिता रंगारी, लालेश्वरी शरणागत, बिरजूला तिडके, अनिता , पुष्पा भगत, पंचशिला शहारे, अनिता झिंगरे, लता बरेकर, शामकला मसराम, अर्चना मेश्राम, मिनाछी पटले, किरन ठवरे, मिनाछी राऊत, छाया सुनिता मडावी प्रामुख्याने उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य अगनंवाडी बाल कर्मचारी युनियन आयटक च्या वतीने सेविका मदतनिस याणी संगठन मजबूत करन्या चे अव्हान जिव वैध यांनी केले.

# जातनिहाय जनगणनाच्या निर्णयाचे स्वागत



**सालेकसा :** जातनिहाय जनगणना करण्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय केंद्र सरकारने बुधवारी घेतला. पुढील जनगणनेत ही प्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात येईल. उल्लेखनीय असे की, काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी जातनिहाय जनगणना व्हावी, अशी मागणी केली होती. दरम्यान केंद्र सरकारने जनगनणा करण्याची घोषणा केल्याने सालेकसा येथे भाजपच्या वतीने जल्लोष करून आतिषबाजी करीत निर्णयाचे स्वागत करण्यात आले.

पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. जातिनिहाय जनगणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह असून सामाजिक न्यायाच्या संकल्पनेस गती देणारा आहे. या जनगणनेतून मिळणाऱ्या आकडेवारीच्या आधारे, समाजातील ज्या गटाला कल्याणकारी योजनांची जास्त गरज आहे, त्यांच्यापर्यंत सरकार या योजना पोहचवू शकेल. सामाजिक लोकशाही मजबूत होईल, आणि लोकांना लोकशाहीने दिलेल्या त्यांच्या हक्काचा न्याय्य वाटा मिळेल. तसेच आजवर ज्या जातींची गणना होऊ शकली नाही आणि योग्य लोकसंख्या समोर येऊ शकली नाही त्यांची योग्य संख्या स्पष्ट झाल्यास त्यांना लोकप्रतिनिधित्व करून त्यांच्या मागण्या देखील मांडता येणार आहे.

यावेळी तालुका अध्यक्ष देवराम चुटे, गुमानसिंग उपराडे, अनुसूचित जाती जिल्हा महामंत्री राजेंद्र बडोले, भाजपा महामंत्री रामदास हत्तीमारे, भाजपा जिल्हा महिला महामंत्री सौ. प्रतिभाताई परिहार, कामगार आघाडी अध्यक्ष गादीप्रसाद भगत, खुशालराव शिवणकर, गुनाराम मेहर, पं.स. सदस्यां सौ.संगीता शहारे, महिला महामंत्री सौ. कविता येटरे, विनोद जैन, प्रेमलाल ठाकरे, युवा मोर्चा निलेश उपराडे, राज सुलाखे, कृष्णा कुरंजेकर, विजय जैतवार, बाबा परिहार, येटरे गुरुजी, नितीन शिवणकर, कार्तिक पटले, शामराव भांडारकर, बबलू श्रीवास्तव,व अनेक भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते होते.

# अनिसची नवेगावबांध शाखेची कार्यकारिणी गठीत



**नवेगावबांध :** जिल्हा परिषद विद्यालयात २९ एप्रिल रोजी डॉ.नरेंद्र दाभोळकर प्रणित महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीची अंधश्रद्धा प्रश्नचिन्ह व पूर्णविराम बाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दरम्यान नवेगावबांध शाखा समितीचे नवीन कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यात अध्यक्षपदी रविंद्रकुमार दहिवले व इतर सहकारी पदाधिकाऱ्यांची निवड करून कार्यकारिणी गठीत करण्यात आली.

यावेळी हरीचंद्र लाडे यांचे पुढाकाराने व महाराष्ट्र राज्य अनिसचे कार्यकर्ते विष्णुदास लोणारे यानी वैज्ञानिक प्रयोग सादर करून, प्रा.डॉ.युवराज खोब्रागडे यांनी अंधश्रद्धा प्रश्नचिन्ह व पूर्णविराम यावर सखोल मार्गदर्शन केले. दरम्यान नवेगावबांध शाखेची कार्यकारिणई गठीत करण्यात आली. तसेच या बाबातची माहिती पोनि. चाफले मॅडम यांना देण्यात आली. त्याप्रसंगी समिती कार्याध्यक्ष रामलाल गंगाबाई विठोबा लांजेवार यांचेकडून त्यांचा मागील ३१ वर्षापासून सुरू असलेल्या ऐच्छिक व निस्वार्थी ग्रंथदान, फोटो/प्रतिमा दान उपक्रमाअंतर्गत स्मृतिषेश आई बाबांचे स्मरणार्थ पोलिस स्टेशन नवेगाव/बांधचे वाचनालयास काही ग्रंथ सस्नेह भेट देण्यात आले. त्याप्रसंगी दुनेदार साहेब पो.ऊ.नि. व इतर सहकारी पोलिस कर्मचारी व समिती अध्यक्ष रवींद्रकुमार दहिवले,कार्याध्यक्ष रामलाल लांजेवार व प्रधान सचिव हरिचंद्र लाडे उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परिक्षेत दक्ष रहांगडालेचे सुयश

## प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सत्कार



**तिरोडा :** तालुक्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय नवेझरी येथील शिक्षण घेणाऱ्या दक्ष गौरीशंकर रहांगडाले या शेतकऱ्याच्या मुलाने नुकतीच घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५ मध्ये घवघववित यश संपादन केल्याने दक्ष शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे. प्रहार जनशक्ती जिल्हा कार्यालय नवेझरी येथे दक्ष रहांगडाले यांचा पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर, दक्षचे वडिल गौरीशंकर रहांगडाले, गोपाळ शेंडे, कमल सोनटक्के, प्रमोद मंदुरकर,संतोष भांडारकर, आशिष बेलपाडे, समिर मेश्राम आदी उपस्थित होते.

# त्या 32 बेघर झालेल्या कुटूंबांना मिळणार घरकुल

## आमदार विनोद अग्रवाल यांचा पाठपुरावा



**गोंदिया :** शहरातील डॉ. आंबेडकर वॉर्डमध्ये रेल्वे लाईनलगत नगर परिषदेच्या जागेवर गेल्या ३० वर्षांपासून झोपड्या बांधून राहत असलेल्या गरीब कुटुंबांच्या ३२ झोपड्या रेल्वे प्रशासनाने दोन वर्षांपूर्वी विकासकामांसाठी तोडल्या होत्या. त्यामुळे ही कुटुंबं बेघर झाली होती. ही कुटुंबं आर्थिक दृष्ट्या कमकुवत असल्यामुळे माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते घनश्याम पानतवने यांनी १६ कुटुंबांसाठी स्वतःच्या खर्चाने प्लॉट खरेदी करून दिले, तर उर्वरित १६ कुटुंबांना अत्यंत कमी दरात प्लॉट उपलब्ध करून देण्यात आले.

या प्लॉटवर घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी या बेघर कुटुंबांनी एक वर्षापूर्वी अर्ज दाखल केले होते. मात्र काही कारणास्तव सर्व अर्ज रद्द करण्यात आले होते.या बाबतची माहिती आमदार विनोद अग्रवाल यांच्याकडे पोहोचताच त्यांनी तात्काळ २ मे रोजी कारवाई करत समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे, अपर तहसीलदार श्रीकांत कांबळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर वॉर्ड येथे–बुलावून घेतले. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन बेघर कुटुंबांशी संवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि सर्व ३२ कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ लवकरच मिळवून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या कार्यवाही तात्काळ करण्याचे निर्देशही दिले. या भेटीत घनश्याम पानतवने, बंटी पंचबुद्धे, व सामाजिक कार्यकर्ते अमित भालेराव देखील उपस्थित होते.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
मालक,मुद्रक,प्रकाशक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,गांधी चौक समोर,भंडारा येथे प्रकाशित केले. संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८-९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-सुरेश लक्ष्मण कोटगले, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# युवा मानस



## चटपटीत आणि कुरकुरीत कॉर्न

झटपट रेसिपी

दोस्तांनो, येता-जाता तोंडात टाकण्यासाठी काही तरी लागतं. संध्याकाळी एखादा कुरकुरीत खमंग पदार्थ चहाची लज्जत वाढवतो. अशा वेळी तुम्ही झटपट तयार होणारे क्रिस्पी कॉर्न बनवू शकता. चला तर, करु या.

**सामग्री:** पाणी, एक कप कॉर्न, लाल तिखट, प्रत्येकी एक चमचा जिरे पूड, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ, दोन ते तीन चमचे कॉर्न फ्लोर, तेल, चिरलेला कांदा आणि कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात कॉर्न घालून पाच मिनिटे शिजवून घ्या. पाणी काढून कॉर्न थंड करायला ठेवा. थंड झाल्यावर कॉर्नमध्ये कॉर्न फ्लोर आणि मीठ घाला. नीट मिक्स करून घ्या. आता कढईत तेल तापवा. तेल गरम झाल्यावर त्यात कॉर्न घाला. सोनेरी रंगावर तळून घ्या. भांड्यात काढून घ्या. दुसऱ्या भांड्यात लाल तिखट, जिरेपूड, चाट मसाला आणि थोडं मीठ एकत्र करा. तळलेल्या कॉर्नवर आपल्या चवीनुसार हा मसाला घाला. त्यावर चिरलेला कांदा आणि कोथिंबिर घालून हलवून घ्या. थोडं लिंबू पिळा.

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं, हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात कोई बोलता ही नहीं।

## समजूतदार होणे गरजेचे

मॅच मेकिंग

मी एका मुलाच्या प्रेमात आहे. गेल्या आठ वर्षांपासून आम्ही एकमेकांना ओळखतो. मला तो आवडत असला तरी तो मात्र मला फक्त चांगली मैत्रीण मानतो. मी अनेकदा त्याच्याकडे प्रेमाची कबुली दिली. समजावण्याचा प्रयत्न केला. पण तो माझ्यावर प्रेम करत नाही. मी त्याला खूप मिस करते. माझ्या मनातून त्याचे विचार जात नाहीत. मी त्याला मेसेज करत असते. सारखी त्याच्या मागे लागते. हे माझ्या स्वत्त्वाच्या विरोधात आहे. पण त्याच्यासाठी मी ही तडजोड करायला तयार आहे. पण यामुळे माझ्या आयुष्यातली भावनिक गुंतागुंत खूप वाढली आहे. मी काय करू?



**उत्तर :** तुझ्यापुढे सध्या भावनिक आव्हान आहे. पण आपली मतं दुसऱ्यावर लादता येत नाही. आपलं प्रेम समोरच्यावर जबरदस्तीने लादता येत नाही. तू या मुलाला समजावण्याचे खूप प्रयत्न केले. पण काहीच साधलं नाही. मला वाटतं की तुला स्वतःविषयी प्रेम वाटत नाही. तसंच तू अजूनही स्वतःला स्वीकारलेलं नाही. त्यामुळे सर्वात आधी तू स्वतःचा विचार कर. तू भावनिकदृष्ट्या समजूतदार होणं गरजेचं आहे. दुसरं म्हणजे या भावनिक गुंतागुंतीतून तुला समुपदेशक बाहेर काढू शकेल. त्याची मदत घे. तुला आयुष्यात नेमकं काय हवं आहे हे आधी समजून घे. या मुलासोबत तुला दीर्घकाळ नात्यात राहायची इच्छा आहे का, तू त्याचा नकार पचवू शकत नाहीस, हे जाणून घे. तुला नक्की मार्ग मिळेल.

## भाजी विकणारा बनला डीएसपी!



अचिव्हर

**कठोर परिश्रम आणि जिद्दीने आयुष्य बदलता येते. त्यासाठी महाराष्ट्राचे आयपीएस अधिकारी नितीन बगाटे यांचे उदाहरण समर्पक आहे. पोलिस अधीक्षक कार्यालयाबाहेर भाजी विकणाऱ्या तरुणाचा त्याच ऑफिसमध्ये पोलिस अधीक्षक पदापर्यंत पोहोचण्याचा हा प्रवास प्रेरणादायी आहे...**

बगाटे यांचा जन्म गरीब कुटुंबात झाला. गरीबीमुळे नितीनने आपल्या कुटुंबाला मदत करण्यासाठी गावातील पोलिस अधीक्षक कार्यालयाजवळ भाजीपाला विकण्यास सुरुवात केली. बिकट परिस्थितीतही नितीनने आपले स्वप्न सोडले नाही. कुटुंबाचे भविष्य चांगले घडवणे हे त्याचे ध्येय होते. नितीनने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करण्याचे ठरवले. हा प्रवास त्याच्यासाठी अजिबात सोपा नव्हता. त्याने अनेक वर्षे कष्ट केले. तो तीनदा मुलाखतीच्या फेरीपर्यंत पोहोचला; पण परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही. तरीही नितीनने हार मानली नाही.

अपयशातून धडे

अपयशातून शिकून तो प्रयत्न करत राहिला. अखेर मेहनतीचे फळ मिळाले आणि नितीन आयपीएस अधिकारी झाला. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी नितीनने काही महत्त्वाच्या टिप्स शेअर केल्या आहेत. त्याने तीन मुख्य मुद्द्यांवर जोर दिला आहे.

* मूलभूत गोष्टींवर लक्ष केंद्रित करा : मूलभूत संकल्पना चांगल्या प्रकारे समजून घ्या आणि मजबूत पाया तयार करा.
* चालू घडामोडींवर लक्ष ठेवा: चांगली वर्तमानपत्रे नियमित वाचा आणि देश आणि जगाच्या घडामोडींबाबत अपडेट राहा.
* समाज समजून घ्या: समाजाच्या समस्या आणि त्यांचे परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न करा.

नितीनच्या मते, शिस्त आणि सातत्य हा कोणत्याही स्पर्धा परीक्षेतील यशाचा कणा असतो.

## टेक अपडेट्स

### 'सोशल मीडिया'चा नवीन प्लॅटफॉर्म

सर्वांना एकमेकांशी जोडून ठेवण्यासाठी आज सोशल मीडिया आहे. फेसबुक आणि इन्स्टाग्रामने जगाला एकत्र आणले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे तुम्ही जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात राहणाऱ्या लोकांशी संपर्क साधू शकता. मात्र आता एक नवीन अहवाल समोर आला



असून त्यानुसार 'एआय' लवकरच लोकांना फेसबुक आणि इन्स्टाग्राम व्यतिरिक्त नवीन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा पर्याय देणार असल्याचे स्पष्ट होत आहे. 'द वर्ज' मधील एका अहवालात हे स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, ओपन एआय 'एक्स'सारखे सोशल नेटवर्क तयार करण्याच्या योजनेवर काम करत आहे. ओपन एआयने आपल्या ॲपचा प्रोटोटाइप तयार केला असून त्यात 'चॅटजीपीटी'ची क्षमता असेल.

## टेक टॉक

### व्हॉट्सॲपवर टाका मोठा व्हिडीओ



व्हॉट्सॲपवर व्हिडीओ स्टेटसचे तुकडे अपलोड करून तुम्हीही कंटाळले असाल तर आता दिलासा मिळणार आहे. व्हॉट्सॲपने वापरकर्त्यांसाठी एक नवीन आणि उपयुक्त फीचर आणण्याची तयारी केली आहे. त्यामुळे आता स्टेटसमध्ये मोठा व्हिडीओ टाकणे सोपे होणार आहे. आता व्हिडीओची स्थिती एक मिनिटाची नाही तर ९० सेकंदांची राहणार आहे. यापूर्वी तुम्ही एकावेळी फक्त ६० सेकंद पर्यंतचा व्हिडीओ अपलोड करू शकत होता. म्हणजेच आता ही मर्यादा ३० सेकंदांनी वाढवली जाणार आहे. याचा थेट फायदा मोठे व्हिडीओ स्टेटस शेअर करणाऱ्यांना होऊ शकतो. अर्थात सध्या हे फीचर फक्त व्हॉट्सॲप च्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. याचा अर्थ असा आहे की ॲपची चाचणी आवृत्ती वापरतात तेच हे फीचर वापरू शकतात. लवकरच हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी जारी केले जाईल. हे नवीन फीचर व्हॉट्सॲप ॲंड्रॉइड व्हर्जन २.२५.१२.९ मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## नवे काय?

### 'व्हिओ'चा सर्वात स्लिम मोबाईल

'व्हिओ टी ४ फाईव्ह जी' लवकरच भारतात लॉन्च होणार आहे. देशात लॉन्च होण्यापूर्वी कंपनीने आगामी हँडसेटची बॅटरी आणि चार्जिंग तपशील उघड केले आहेत. स्मार्टफोनची जाडी आणि वजन याचीही पुष्टी झाली आहे. यात क्वाड-वक्र डिस्प्ले आणि स्नॅपड्रॅगन चिपसेट असल्याचे सांगितले जाते.

फोनची प्रमुख वैशिष्ट्ये तसेच फोनची संभाव्य किंमत आधीच ऑनलाइन उघड झाली आहे. 'व्हिओ टी ४ फाईव्ह जी' मार्चमध्ये भारतात लॉंच झालेल्या 'व्हिओ टी ४ एक्स फाईव्ह जी' सह-अस्तित्वात असण्याची अपेक्षा आहे. कंपनीने एक्स-पोस्टमध्ये पुष्टी केली आहे की 'व्हिओ टी ४ फाईव्ह जी' ७,३०० एमएएच बॅटरी पॅक करेल. फोन ब्लूव्होल्ट बॅटरी एनोड मटेरियल आणि थर्ड-जनरेशन सिलिकॉन वापरेल. हा फोन त्याच्या मागील मॉडेलच्या तुलनेत १५.७ टक्के ऊर्जा घनता




सुधारेल असे म्हटले जाते. कंपनीने पुढे दावा केला की, फोनची बॅटरी कार्बन नॅनोट्यूब कंडक्शन, इलेक्ट्रोड रीशेपिंग आणि नॅनो केज स्ट्रक्चर तंत्रज्ञानाचा वापर करेल. ते वेळेनुसार बॅटरीचे आरोग्य राखण्यास मदत करते.

हा फोन फ्लॅशचार्ज तसेच रिव्हर्स आणि बायपास चार्जिंगला सपोर्ट करेल. बायपास चार्जिंग फोनला बॅटरी बायपास करण्यास आणि चार्जरमधून थेट पॉवर वापरण्यास सक्षम करेल. 'व्हिओ' च्या मते, हा फोन देशातील सर्वात पातळ स्मार्टफोन असेल. आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यात ७,३००एमएएच बॅटरी असेल. व्हिओ टी ४ फाईव्ह जी' ची एमरल्ड ब्लाझे आवृत्ती ७.८९ एमएम जाडी आणि १९९ ग्रॅम वजनाची असेल. फोन फॅंटम ग्रे शेडमध्ये येण्याची अपेक्षा आहे. याची किंमत २०,००० ते २५,००० रुपयांदरम्यान असण्याची शक्यता आहे.

## ब्रंचचा आनंद लुटा

फॅशन पॅशन



उन्हाळ्यात मित्रमंडळींसोबत ब्रंचला जाताना आपला फॅशन सेंस अवश्य जपा. तुमच्या ब्रंच सेशनसाठी या काही खास फॅशन टिप्स...

* कूल लूक मिळवायचा असेल तर ट्रेंडी टी शर्टवर एखादा ब्लेझर घाला. खूप उकडत असेल तर ब्लेझर काढूनही ठेवता येईल. एसीमध्ये ब्लेझर घाला.
* या दिवसात शॉर्ट्सपेक्षा फॅन्सी किंवा आरामदायी दुसरं काहीच असू शकत नाही. उन्हाळ्यात गारव्याची अनुभूती घ्यायची असेल तर पेस्टल शेड्सच्या शॉर्ट्स ट्राय करा. कॅमॉफ्लेज रंगही चालून जातील.
* कॅज्युअल लूकसाठी लोफर्स कॅरी करा. यामुळे तुम्हाला खूप आरामदायी वाटेल. रस्ट रेड, ऑलिव्ह ग्रीन तसंच पिवळ्या रंगातल्या शेड्स तुमचा लूक खुलवतील.
* उन्हाळ्यात गॉगल मस्ट आहे. चेहऱ्याला साजेसा गॉगल घाला. हटके रंगाच्या ऑफ बीट फ्रेम्स निवडताना अजिबात घाबरू नका. ट्रेंडी डिझाइन्सवर भर द्या.
* डोक्यावर छानशी टोपी घाला आणि गप्पाटप्पा करत ब्रंचचा आनंद लुटा.

## चला पुरुषवाडीला

भटकंती

निसर्गाची किमया आपल्याला थक्क करते. आपण अनेक नैसर्गिक चमत्कार भान हरपून बघत रहातो. आसपासचा निसर्ग सतत खुणावत असतो. वसंतातल्या कोकिळेच्या कूजनाने कान सुखावतात. प्रत्येक ऋतू निसर्गाचे वेगवेगळे रंग दाखवत असतो. असंच एक दृश्य पुरुषवाडीतही पहायला मिळतं. मे आणि जून महिन्यातल्या रात्री पुरुषवाडी काजव्यांच्या प्रकाशाने उजळून निघालेल्या असतात. हा काजव्यांच्या प्रजननाचा काळ असल्यामुळे इथे काजवा महोत्सवाचं आयोजन केलं जातं. या महोत्सवात सहभागी होणाऱ्यांना काजव्यांचं मनोहारी जग अनुभवायला मिळतं. तुम्हीही काहीतरी वेगळं, भन्नाट करायच्या विचारात असाल



तर पुरुषवाडीची ट्रिप प्लॅन करा.

पुरुषवाडी हे अहमदनगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातलं छोटंसं गाव. रेल्वे किंवा वाहनाने या ठिकाणी जाता येतं. नाशिकजवळच्या इगतपुरी स्थानकावर उतरून पुरुषवाडीला जाता येईल. नाशिक, पुणे, शिरडीवरुनही पुरुषवाडीला जाण्याची सोय आहे. २५ मे ते २३ जून या काळात इथे काजवा महोत्सवाचं आयोजन केलं जातं. त्यातही जूनच्या पहिल्या दोन आठवड्यांमध्ये लाखोंच्या संख्येने काजवे पहायला मिळतात. तसंच पावसाला नुकतीच सुरुवात होत असल्याने इथला परिसर हिरवागार झालेला असतो. काजवा महोत्सवासोबतच इथे बऱ्याच ॲक्टिव्हिटीज करता येतात. तुम्ही इथे तंबूत राहण्याचा आनंद तुम्ही लुटू शकता. नदीत डुंबू शकता. ग्रामीण जीवन अनुभवू शकता.चुलीवरच्या अस्सल ग्रामीण भोजनाचा आनंद घेऊ शकता. पुरुषवाडीत दोन दिवस अगदी मजेत जातील. त्यामुळे मे-जूनमध्ये छोटी ट्रिप काढायची असेल तर पुरुषवाडीला नक्की जा.

## ट्रेकिंगसाठी तयार?

स्टे फिट



दोस्तांनो, ट्रेकला जायचं तर फिटनेस हवा. चलता है... हा ॲटिट्यूड अशावेळी उपयोगाचा नाही. फक्त जास्त उंचीवरच्या, कठीण ट्रेक्ससाठी तयारी करून भागत नाही. सोपे आणि साधे ट्रेक्स आणि ट्रेल्सही आपल्या फिटनेसची परीक्षा बघत असतात. त्यामुळे ट्रेक कोणताही असला तरी तंदुरुस्ती राखणं गरजेचं असतं. यासाठी अगदी साधे व्यायाम करता येतील.

* धावण्याला परिपूर्ण व्यायाम म्हटलं जातं. संपूर्ण शरीराला याचे लाभ होतात. हा कार्डिओ व्यायामप्रकार आहे. यामुळे तुमचं शरीर हायकिंगसाठी तयार होतं. स्नायू बळकट होतात. स्टॅमिना वाढतो.
* स्क्वॉट्समुळे पायांची क्षमता वाढते. ट्रेकिंग करायचं तर पाय बळकट हवे. ही बळकटी स्क्वॉट्समुळे मिळते. स्क्वॉट्सचे अनेक प्रकार आहेत. त्यांचं मिश्रण करून तुम्ही पायांना शक्ती देऊ शकता. स्क्वॉट्समुळे हृदय बळकट होतं. रक्तदाब नियंत्रणात रहातो आणि रक्तातल्या साखरेचं प्रमाणही वाढत नाही.
* स्नायूंना बळकटी मिळवून देण्यासाठी लंजेस करा. फॉरवर्ड आणि बॅकवर्ड लंजेसच्या मिश्रणातून पायांचे स्नायू बळकट होतात. इतकंच नाही तर वेड्यावाकड्या वळणांवर शरीराचा समतोल साधणंही यामुळे शक्य होतं.
* लेग लिफ्ट्समुळे पायांचे स्नायू ताणले जातात. लवचिकता वाढते. या व्यायामामुळे चालताना किंवा चढण्यामुळे येणारा अतिरिक्त ताण झेलण्यासाठी पाय सक्षम होतात.
* नवख्या ट्रेकर्सनी जिने चढण्यापासून व्यायामाला सुरुवात करावी. हा अगदी साधा आणि कुठेही करता येण्यासारखा व्यायाम आहे. जिने चढल्याने जॉगिंगपेक्षाही जास्त कॅलरी खर्च होतात. हृदय, मज्जासंस्थेचं आरोग्य सुधारतं.

## लॅपटॉप स्लो झालाय?

स्टडी टॉक



अनेकजण ऑफिसच्या कामासाठी लॅपटॉप वापरतात. मात्र लॅपटॉपच्या स्लो स्पीडमुळे त्रस्त असणाऱ्यांचे प्रमाणही बरेच मोठे आहे. म्हणजेच लॅपटॉपवर गेम खेळणाऱ्यांपासून ऑफिसची कामे करणाऱ्यांपर्यंत लोक लॅपटॉपच्या मंदगतीने हैराण झाले आहेत. पण चांगली बातमी अशी आहे की, काही सोप्या आणि किफायतशीर युक्तीचा अवलंब करून तुम्ही लॅपटॉपचा वेग वाढवू शकता. स्मार्टफोन जुने होते तसतसे लॅपटॉपची कार्यगतीही कालांतराने हळू होते. पण काही सोप्या बदलांमुळे तुम्ही ही जुनी यंत्रणा कार्यक्षम बनवू शकता.

* लॅपटॉप हार्ड डिस्क ड्राइव्ह (एचडीडी) वर चालत असेल तर तो 'एसएसडी'मध्ये बदला. 'एसएसडी'मुळे डेटा ट्रान्सफरचा वेग लक्षणीय वाढतो. त्यामुळे संपूर्ण प्रणाली वेगवान होते.
* लॅपटॉपमध्ये फक्त चार जीबी रॅम असेल तर ते आठ जीबी किंवा १६ जीबीपर्यंत वाढवा. यामुळे लॅपटॉपची एकाच वेळी अनेक कामे करण्याची क्षमता वाढेल. रॅम वाढल्याने लॅपटॉपचा वेग मोठ्या प्रमाणात वाढतो आणि एकाच वेळी अनेक कामे करण्यात कोणतीही अडचण येत नाही.
* अनावश्यक फाइल्स, सॉफ्टवेअर आणि प्रोग्राम डिलीट करा. स्टोरेज मोकळे केल्यास सिस्टमचे कार्य अधिक वेगवान होईल.
* विंडोज आणि इतर सॉफ्टवेअरच्या नवीनतम व्हर्जनमध्ये अनेकदा दोष निराकरणे आणि कार्यप्रदर्शन सुधारणा असतात. त्यामुळे वेळोवेळी सिस्टम अपडेट करत रहा. याशिवाय व्हायरस आणि मालवेअरही सिस्टीम मंदावू शकतात. अशा परिस्थितीत चांगले ॲंटीव्हायरस वापरुन प्रणाली सुरक्षित आणि प्रभावी ठेवू शकता.
* लॅपटॉप सुरू होताच आपोआप सुरू होणारे प्रोग्राम बंद करा. यासाठी टास्क मॅनेजर उघडा आणि स्टार्टअप टॅबवर जाऊन अनावश्यक ॲप्स बंद करा.

## डिजिटल मार्केटिंगमध्ये घडवा भविष्य

भविष्यवेध

आजच्या काळात प्रत्येकाला आवडीचे काम करायचे आहे खेरीज त्यातून भविष्यात स्थिरता आणि चांगले उत्पन्नदेखील मिळण्याची अपेक्षा आहे. अशांनी डिजिटल मार्केटिंगमध्ये करिअर करण्याचा निर्णय घेणे योग्य ठरेल.

इंटरनेटचा वाढता वापर आणि ऑनलाइन शॉपिंगचा ट्रेंड यामुळे हे क्षेत्र झपाट्याने प्रगत झाले आहे. डिजिटल मार्केटिंग ही एक प्रक्रिया असून त्यामध्ये कंपन्या सोशल मीडिया, ईमेल, ब्लॉग आणि डिजिटल जाहिरातींद्वारे आपली उत्पादने आणि सेवांचा प्रचार करतात. यामध्ये ऑनलाइन ओळख निर्माण करुन अपेक्षित प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी मोहिमा चालवण्याचा समावेश असतो. अलिकडे नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म उदयास येत आहेत, तसतसे त्यांचा वापरदेखील बदलतो आहे. तेव्हा नवीन ट्रेंड समजून घेणे आणि ते ब्रॅंडच्या ऑनलाइन ओळखीवर कसा परिणाम करतात हे जाणून घेणे, हे डिजिटल मार्केटिंग व्यवस्थापकाचे काम आहे. 'गुगल' सारखे सर्च इंजिन कोणतेही अपडेट आणते, तेव्हा मार्केटिंग टीमला त्यांची रणनीती पुन्हा तयार करावी लागते. यामुळे हे करिअर आव्हानात्मक आहेच खेरीज ते बरेच काही शिकवून जाते.



**भविष्याचा उत्तम मार्ग**

आज पारंपरिक विपणन अस्तित्वात असले तरी अचूकता आणि कमी किमतीमुळे डिजिटल मार्केटिंगने वेगाने लोकप्रियता मिळवली आहे. यामध्ये लोक कुठून येत आहेत, वेबसाइटवर काय करत आहेत आणि कोणते तंत्र उत्तम परिणाम देत आहे हे तुम्ही सहज पाहू शकता.

**नोकऱ्यांना जास्त मागणी का?**

२०२८ पर्यंत डिजिटल मार्केटिंगचा आकार सुमारे २४.१ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल आणि तो ३२.१ टक्के दराने वाढेल असा अंदाज आहे. २०२७ पर्यंत सुमारे सहा अब्ज लोक इंटरनेट वापरतील. याचा सरळ अर्थ असा की, कुशल डिजिटल मार्केटर्सची गरज आणखी वाढेल. 'लिंक्ड इन' च्या मते, डिजिटल मार्केटिंग स्पेशालिस्ट आज सर्वात जास्त मागणी असणाऱ्या नोकऱ्यांपैकी एक आहे. ८.६ लाखांहून अधिक नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत.

**काय भूमिका?**

डिजिटल मार्केटिंगमध्ये ईमेल मार्केटिंग, सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन (एसईओ), कॉपीरायटिंग, कंटेंट रायटिंग, सोशल मीडिया मॅनेजमेंट, डिजिटल जाहिरात आणि सर्च इंजिन मार्केटिंग (एसईएम) यासारख्या विविध भूमिकांचा समावेश होतो. प्रत्येक भूमिकेसाठी वेगवेगळी कौशल्ये आवश्यक असतात.

**किती पगार?**

डिजिटल मार्केटिंगमधील तुमचा पगार अनुभवावर, कौशल्यांवर आणि स्थानावर अवलंबून असतो. भारतातील डिजिटल मार्केटिंग मॅनेजरचे सरासरी वार्षिक वेतन सुमारे ६.४ लाख रुपये आहे तर अमेरिकेत ते १,२२,११८ डॉलर; ऑस्ट्रेलियामध्ये १,०९,८५७ डॉलर, ब्रिटनमध्ये ५०,६८३ आहे.

# ब्राह्मण महासंघाच्या विरोधानंतर
# फुले चित्रपटास तूफान गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

स्त्रियांना शिक्षणाचे द्वार खुले करणारे थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर आधारित हिंदी चित्रपटाला नागपुरात उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षातर्फे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित ह्यफुलेह्न चित्रपटांच्या विशेष शोचे नागपुरातील सदर येथील बुटी (स्मृती)चित्रपटगृहात सोमवारी आयोजन करण्यात आले.

ब्राह्मण महासंघाने या चित्रपटास आक्षेप घेतला होता. चित्रपटामुळे पुन्हा जातीय वाद वाढू शकतो, अशी शक्यतादेखील महासंघाने वर्तवली होती. ब्राह्मण रक्षा मंच ही संघटना या चित्रपटाला सर्वाधिक विरोध करत आहे.

या चित्रपटात ब्राह्मणांची प्रतिमा मलिन केल्याचा आणि त्यांना चुकीच्या पद्धतीने चित्रित केल्याचा आरोप संघटनेने केला होता. फुले हा चित्रपट महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समाजसुधारणेच्या संघर्षमय वाटचालीवर आधारित आहे.



प्रतीक गांधी यांनी महात्मा फुलेंच्या आणि अभिनेत्री पत्रलेखा यांनी सावित्रीबाई फुलेंची भूमिका केली आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्यासह स्त्री शिक्षण, जाति निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी झुंज दिली. ब्रिटिशकालीन भारतात त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

शेतकरी आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी लढा दिला. त्यांची प्रेरणादायी कथा आता रूपेरी पडद्यावर आली आहे. विशेष म्हणजे हा चित्रपट केवळ ऐतिहासिक घटनांचा आढावा घेत नाही, तर सामाजिक समतेचा लढा नव्या पिढीसमोर आणणार आहे. काही संघटनांनी फुले चित्रपटातील काही दृष्य आणि संवाद यावर आक्षेप घेतला होता. त्यामुळे हा चित्रपट नियोजित वेळी प्रदर्शित होऊ शकलेला नाही.

आता हा चित्रपट प्रदर्शित झाला असून त्यात नेमके काय बदल करण्यात आले आले. मूळ चित्रपट कसा होता. याबाबत कमालिची उत्सुकता प्रक्षेकांमध्ये दिसून येत आहे.

ज्योतिबा फुले यांनी समाजातील अनिष्ठ प्रथा आणि परंपराविरोधात आवाज उठवला. समाजाला धुडकावून त्यांनी सर्वात आधी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकवले. ज्या काळात समाजात बालविवाह, सती जाणे, विधवांचे मुंडन करणे यांसारख्या प्रथा राजरोसपणे सुरू होत्या. ही कथा सुमारे १२५ वर्षांपूर्वीची आहे.

पत्रलेखा यांनी सावित्रीबाईंचे पात्र साकारले आहे, त्याबद्दल तिचे कौतुक जेवढे करावे तेवढे कमीच आहे. ती तुम्हाला सावित्रीबाई फुलेंसारखी दिसते, एका दृश्यात जेव्हा एक माणूस तिला धमकी देतो की, जर तिने मुलींना शिकवणे थांबवले नाही तर तो तिचा नवरा ज्योतिबा फुले यांना मारेल, तेव्हा पत्रलेखा त्याला एक गोष्ट सांगते आणि त्याला जोरदार चपराक मारते. राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांच्या पुढाकाराने या शोचे आयोजन करण्यात आले. या शोले नागपुरकरांनी तूफान गर्दी केली होती.

# गौतम बुद्धांच्या रत्नांचा हाँगकाँगमध्ये होणार लिलाव
## प्रकाश आंबेडकर यांनी केला निषेध

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



तथागत गौतम बुद्धांच्या पार्थिव अवशेषांशी संबंधित काही मौल्यवान रत्नांचा हाँगकाँगमध्ये लिलाव करण्यात येणार आहे. या रत्नांचा शोध आधुनिक काळातील सर्वात आश्चर्यकारक पुरातत्वीय शोधांपैकी एक मानला गेला आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी या लिलावाचा निषेध करत सरकारला या प्रकरणी हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी एका पोस्टद्वारे गौतम बुद्धांशी संबंधित अनमोल रत्नांचा लिलाव होण्याची बाब समोर आणली आहे. ते आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, आधुनिक काळातील सर्वात आश्चर्यकारक पुरातत्वीय शोधांपैकी एक म्हणून वर्णन करण्यात आलेल्या तथागत गौतम बुद्धांच्या पार्थिव अवशेषांशी संबंधित काही मौल्यवान रत्नांचा हाँगकाँगमध्ये लिलाव करण्यात येणार आहे.

हे रत्न 1898 मध्ये बुद्धाच्या अवशेषांसोबत सापडले होते. ते मूलतः सध्याच्या उत्तर प्रदेशातील पिप्रहवा येथील स्तूपात इसवीसन पूर्व 240-200 मध्ये दफन करण्यात आले होते. तत्पूर्वी, इसवीसन पूर्व 480 च्या सुमारास बुद्धांचे निधन झाले तेव्हा त्यांच्यावरील अंत्यसंस्कारावेळी ते त्यांच्या अवशेषांसोबत (अस्थी) गोळा करण्यात आले होते.

हे रत्न बुद्धांच्या शारीरिक अवशेषांसोबत कायम भेट म्हणून राहणार होते. त्यामुळे ते दस्तुरखुद्द बुद्धांची मालमत्ता आहेत. भारतातील ब्रिटिश राजवटीत हे रत्न बेकायदेशीरपणे मिळवले गेले होते आणि आता त्यांचा लिलाव केला जात आहे. हे रत्न येशू ख्रिस्त किंवा इतर एखाद्या धर्माचे अवशेष समजून लिलाव केले असते तर काय झाले असते? याची कल्पना करा.

ही केवळ रत्ने नाहीत. ही रत्ने श्रद्धेच्या वस्तू आहेत. बुद्धांना अर्पण केलेली आहेत. बुद्धांच्या सांसारिक अवशेषांच्या सानिध्यामुळे ती पवित्र झालेली आहेत. त्यामुळे मी या लिलावाचा निषेध करतो. तसेच सरकारला या प्रकरणात लवकरात लवकर हस्तक्षेप करण्याची विनंती करतो, असे प्रकाश आंबेडकरांनी म्हटले आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात अवकाळीचे थैमान

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ५ :

हवामान खात्याने दर्शविलेला अवकाळी पावसाचा अंदाज मर्यादित स्वरूपात का होईना खरा ठरला. जिल्ह्यातील काही भागात अवकाळी पावसाने गारपीट, वाऱ्यासह हजेरी लावली आहे. वीज पडून तीन पाळीव जनावरांचा मृत्यू झाला.

बुलढाणा जिल्ह्याच्या घाटावरील भागातील काही तालुक्यांत आज सोमवार, ५ मे रोजी संध्याकाळी निसगार्चे हे अवकाळी थैमान पाहवयास मिळाले. लोणार शहर व तालुक्यातील अनेक गावांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. लोणार शहरात कमी पावसाने हजेरी लावली.

## वीज पडून जनावरे ठार

मात्र बीबी या गावासह बीबी महसूल मंडळांतर्गत येणाऱ्या बहुतेक गावात, तसेच अन्य मंडळात अवकाळी चांगलीच हजेरी लावल्याचे वृत्त आहे. सिंदखेड राजा व मेहकर तालुक्याला जोडणाऱ्या बीबी गावात अवकाळी पावसाने मध्यम स्वरूपाची हजेरी लावली. पावसाच्या तुलनेत वाऱ्याचा वेग जास्त होता. बीबी व लगतच्या गावात बोरी एवढ्या आकाराच्या गार पडल्या.

सिंदखेड राजा तालुक्यात आज सोमवारी विजेने थैमान घातले. तालुक्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. मात्र पावसाचा जोर कमी होता. या दरम्यान सावखेड तेजन येथे आज वीज अंगावर कोसळून तीन जनावरे दगावली. यात एक बैल, एक गाई आणि एका वासराचा समावेश आहे.

झाडाखाली बांधून ठेवलेली ही जनावरे विश्राम करीत असताना त्यांच्यावर विजेचा लोळ कोसळला. त्यात त्यांचा मृत्यू झाला. तलाठी व सिंदखेड राजा तहसील कार्यालय कर्मचारी यांनी सावखेड तेजन येथे भेट देऊन पंचनामा केला. तसेच तहसीलदार सिंदखेड राजा आणि जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर केला.

# अण्णाभाऊ साठेंच्या लेकीचे मुंबईत निधन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :



अण्णा भाऊ साठेंच्या जगप्रसिद्ध फकीरा कादंबरीच्या लेखन साक्षीदार शांताबाई साठे (दोडके) यांचे निधन झाले. त्या 90 वर्षांच्या होत्या. कांदिवली येथील सेव्हन स्टार रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पार्थिवावर बोरीवली येथील दौलतनगर स्मशानभूमीत सायंकाळी 7.30 वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

लेखक विश्वास पाटील यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत शांताबाई साठे यांच्या आठवणींना उजाळा दिला. घाटकोपरच्या चिरागनगरच्या झोपडपट्टीत 1958 च्या दरम्यान अण्णा 'फकीरा' कादंबरी लिहित होते. सतत तीन महिने अहोरात्र लेखन करून शेवटी अण्णा भाऊ त्या बेहोषीत अतिश्रमाने खाली कोसळले होते. तेव्हा याच शांताबाईंनी त्यांना सावरले होते, असे विश्वास पाटील म्हणाले.

अण्णा भाऊ साठेंच्या द्वितीय पत्नी जयवंताबाई दोडके यांच्या शांता आणि शकुंतला या दोन लेकी. चिरागनगरच्या झोपडपट्टीत अण्णाभाऊंनी एकाहून एक अशा अप्रतिम कादंबऱ्या आणि कथा लिहिल्या. तेव्हा अण्णाभाऊ आणि जयवंताबाईंच्या सहचर्यामध्ये अण्णा भाऊंची साहित्यगंगा जशी काही दुथडी भरून वाहत होती. त्याच दिवसात अण्णांनी माकडीचा माळ, बरबाद्या कंजारी, चित्रा, चंदन, वारणेचा वाघ, आवडी अशा अनेक कथा व कादंबऱ्या लिहिल्या होत्या.

अण्णा भाऊ साठेंच्या प्रेरणेने शांताबाई स्वतः कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीमध्ये सुद्धा सहभागी झाल्या होत्या. त्यांनी प्रसिद्ध अभिनेते बलराज सहानी, कॉम्रेड रेड्डी व शाहीर अमर शेख, कॉम्रेड गव्हाणकर व इतरांच्या सोबत तुरुंगवासही भोगला होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर 15 ऑगस्टला छोट्या शांता आणि शकुंतला यांना घेऊन अण्णाभाऊ मुंबईच्या गेटवे ऑफ इंडियाची आरास बघून आले होते.

21 नोव्हेंबर 1955 ला जेव्हा मोरारजीच्या पोलिसांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी झुंज देणाऱ्या 15 हुतात्म्यांचा बळी घेतला. त्या रात्री अण्णाभाऊ आपल्या झोपडपट्टीच्या दारात रात्रभर माझी मैना गावावर राहिली ही प्रसिद्ध रणलावणी लिहीत होते. त्या ऐतिहासिक प्रसंगाच्या साक्षीदार शांता आणि शकुंतला ह्या दोघी बहिणी होत्या. संजय, राजेश आणि प्रशांत ह्या सपताल बंधूनी आपल्या मातेसमान मावशीची, शांताबाईंची खूप काळजी घेतली होती. कालच वार्धक्याने शांताबाईंचे वयाच्या 90 व्या वर्षी मुंबईत निधन झाले.

# मॅरेज जिहाद तपासण्याची गरज

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ५ :



पाकिस्तानातून विवाह करून भारतात आलेल्या महिलांच्या संख्येत वाढ होत असून, त्यामागे 'मॅरेज जिहाद'सारख्या कट कारस्थानाची शक्यता नाकारता येत नाही. हे लग्न नसून, हे एक प्रकारचे क्रॉस बॉर्डर अंडरवर्ल्ड ऑपरेशन असून, त्याचा तपास राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व्हावा, अशी मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली आहे.

सदावर्ते पुढे बोलताना म्हणाले की, जर हे मॅरेज जिहाद असेल तर त्याला प्रेम किंवा लग्न म्हणता कामा नये. हे ठरवून रचलेलं टेररिस्ट कृत्य आहे. अशा लग्नांना पूर्णविराम देणे आवश्यक आहे.

सदावर्ते म्हणाले की, अतिदुर्गम भागात असलेल्या मदरशांची नियमित आणि सखोल चौकशी व्हावी असे म्हणतानाच त्यांनी मदरशांबाबतही संशय व्यक्त केला. ज्या प्रकारे काश्मीरमध्ये नागरिकांनी त्रास सहन केला, त्याच धर्तीवर देशात अंतर्गत सुरक्षेला धोका पोहोचवणारी परिस्थिती निर्माण तर होत नाही ना, याची सखोल तपासणी झाली पाहिजे.

# अल्पवयीन मुलीसोबत मध्यप्रदेशातील युवकाचा विवाह
## चौघांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. ५ :

तुमसर तालुक्यातील गोबरवाही पोलिस स्टेशन हद्दीत एका गावात 17 वर्ष 10 महिने अल्पवयीन मुलीचा एका आंतरराज्यीय मुलासोबत विवाह लावून दिला. मात्र याची माहिती चाइल्ड हेल्पलाईनला टोल फ्री क्रमांक 1098 वर मिळाली. जिल्हा व महिला बालविकास विभाग भंडारा व चाइल्ड लाइन भंडारा यांच्या संयुक्त पथकाने अल्पवयीन मुलीचे गाव गाठत खातरजमा केली असता, हा विवाह 25 एप्रिल रोजी पार पडल्याचे समजले.

या प्रकरणाची चौकशी केली असता मुलीचे वय कमी असल्याने ग्रामसेवकाच्या तक्रारीवरून गोबरवाही पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर अशाप्रकारचे कृत्य केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, अशी तंबी कुटुंबीयांसोबत गावकऱ्यांना देण्यात आली आहे.

तुमसर तालुक्यातील गोबरवाही पोलिस स्टेशन हद्दीतील एका गावात 17 वर्ष 10 महिने अल्पवयीन मुलीचे लग्न 25 एप्रिलला मध्यप्रदेशातील एका तरुणाशी लावून दिले. मात्र सजग नागरिकांनी याची माहिती चाईल्ड हेल्पलाईन दिली. यानंतर जिल्हा महिला व बालविकास विभाग, चाइल्ड लाइन, भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने खातरजमा करण्यात आली. त्यानंतर अल्पवयीन मुलीचे गाव गाठत बालविवाह झाल्याचे लक्षात आल्यानंतर ग्रामसेवक यांच्या तक्रारीवरून गोबरवाही पोलिस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असतांना गावातील सरपंच, पोलिस पाटील, अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर हे बालविवाह प्रतिबंधक कमिटीचे सदस्य असून सुद्धा गावातील विवाह का लक्षात आला नाही, हा मात्र संशोधनाचा विषय ठरला आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातील ग्रामसेवक हे बाल विवाह प्रतिबंध अधिकारी असून सुद्धा या सारख्या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

# बंदुकीचा धाक दाखवत लैंगिक अत्याचार
## नागपूरच्या महिलेचे शिवसेना नेत्यावर गंभीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

महाराष्ट्रातील नागपूरमध्ये एका शिवसेना नेत्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. एका महिलेने त्याच्याविरुद्ध लैंगिक छळाचा गुन्हा दाखल केला आहे. पीडितेने सांगितले की, बंदुकीचा धाक दाखवत तिच्यावर लैंगिक संबंध ठेवण्यासाठी दबाव आणला.

प्रकरण उघडकीस आल्यापासून आरोपी फरार आहे. आरोपीचे नाव मंगेश काशीकर आहे, जो शिवसेनेत संपर्कप्रमुख पदावर आहे. रविवारी हॉटेलमध्ये काम करणा?या एका महिलेने मंगेशवर गंभीर आरोप केले आहेत.

पीडितेने नागपूरमधील बजाज नगर पोलिस ठाण्यात मंगेशविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. पीडितेचे म्हणणे आहे की मंगेशने तिला फसवले की त्याचे खूप मोठे हॉटेल आहे. हॉटेलचे नूतनीकरण करण्यासाठी त्याला पैशांची गरज आहे. पीडितेने मंगेशच्या हॉटेलमध्ये दीड कोटी रुपये गुंतवले होते.

पीडितेने पोलिसांना सांगितले की, जेव्हा तिला हे सत्य कळले की ते हॉटेल मंगेशचे नाही, तेव्हा तिने तिचे पैसे परत मागितले. अशा परिस्थितीत मंगेशने तिचा लैंगिक छळ केला. त्याने तिच्यावर शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दबाव आणला.

: हॅलो डॉक्टर :

# वंध्यत्वावर मात करणारे IVF तंत्रज्ञान

काही वर्षापूर्वी वंध्यत्व हा गंभीर विषय होता. विवाहानंतर एखाद्या जोडप्याला काही वर्षापर्यंत अपत्य प्राप्ती होत नसेल तर अशा जोडप्याला वंध्यत्व आल्याची शक्यता जास्त असे. म्हणजे त्यांना नैसर्गिक प्रयत्नातून अपत्याची शाश्वतीच नसायची. मात्र आधुनिक वैद्यक शास्त्राने इतकी प्रगती केली कि आज आय व्ही एफ तंत्रज्ञानाद्वारे कृत्रिम पद्धतीने गर्भधारणा करून स्त्रीला अपत्यप्राप्तीचे सुख मिळणे सुलभ आणि सहजसाध्य गोष्ट बनलेली आहे. हे आयव्हीएफ तंत्रज्ञान नेमके काय आहे? याच संदर्भात डॉ. के. यू. कुंजीमोईदीन, प्रादेशिक वैद्यकीय संचालक, बिर्ला फर्टिलिटी आणि आयव्हीएफ एआरएमसी यांचाश्री केलेली बातचीत.

**आयव्हीएफ हे तंत्रज्ञान नेमके काय आहे?**

■ अनेक जोडप्यांसाठी, कुटुंब सुरू करणे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. तथापि, जगभरातील लाखो लोकांना प्रभावित करणारी वंध्यत्वाची स्थिती लक्षणीय भावनिक आणि शारीरिक आव्हाने निर्माण करू शकते.

वैद्यकीय शास्त्रातील प्रगतीमुळे, आयव्हीएफ (इन विट्रो फर्टिलायझेशन) आणि सहाय्यक पुनरुत्पादन तंत्रज्ञान (एआरटी) हे शक्तिशाली उपाय बनले आहेत, जे केवळ जोडप्यांना गर्भधारणा करण्यास मदत करत नाहीत तर माता आणि गर्भधारणेच्या परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा देखील करतात.

**गर्भधारणेपूर्वी व्यापक तपासणी करणे आवश्यक असते का?**

■ आयव्हीएफ द्वारे मातृत्वाचे आरोग्य सुधारण्याचा सर्वात महत्त्वाचा मार्ग म्हणजे व्यापक पूर्व-संकल्पना तपासणी. [illegible] करण्यापूर्वी, जोडप्यांचे अनुवांशिक



परिस्थिती, हार्मोनल असंतुलन आणि मधुमेह किंवा उच्च रक्तदाब सारख्या आरोग्य समस्यांसाठी पूर्णपणे मूल्यांकन केले जाते. गर्भधारणेपूर्वी या समस्या ओळखणे आणि त्यांचे व्यवस्थापन केल्याने गर्भधारणेशी संबंधित धोके लक्षणीयरीत्या कमी होतात. परिणामी, आयव्हीएफ द्वारे गर्भधारणेमध्ये प्रवेश करणाऱ्या महिला अनेकदा चांगल्या प्रकारे माहितीपूर्ण आणि वैद्यकीयदृष्ट्या तयार असतात, ज्यामुळे निरोगी गर्भधारणा होते.

आयव्हीएफ गर्भधारणेच्या वेळेवर चांगले नियंत्रण देखील सक्षम करते. गर्भावस्थेतील मधुमेह, प्री-एक्लेम्पसिया आणि गर्भपाताचे धोके यासारख्या अनेक मातृ गुंतागुंती आईच्या वयानुसार वाढतात. आयव्हीएफमध्ये, आईचे वय आणि आरोग्याची स्थिती इष्टतम असताना गर्भ तयार केले जाऊ शकतात आणि क्रायोप्रेझर्व (गोठवलेले) केले जाऊ शकतात, ज्यामुळे महिलांना अधिक लवचिकता मिळते आणि जेव्हा त्या शारीरिकदृष्ट्या तयार असतात आणि आरोग्याचे धोके कमी असतात तेव्हा निरोगी गर्भधारणा होते.

**सुरक्षित गर्भधारणा यशस्वी होते का?**

■ आयव्हीएफचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे अनेक गर्भधारणा कमी करण्यात त्याची भूमिका, ऐतिहासिकदृष्ट्या माता आणि बाळांसाठी एक महत्त्वाचा जोखीम घटक.आहे. पूर्वी, गर्भधारणेच्या यशाचा दर वाढवण्यासाठी अनेक गर्भ हस्तांतरित करणे ही सामान्य पद्धत होती, ज्यामुळे अनेकदा जुळे किंवा तिहेरी मुले होतात आणि गर्भधारणेच्या गुंतागुंत वाढतात. आता, सुधारित तंत्रज्ञान आणि प्रीइम्प्लांटेशन जेनेटिक टेस्टिंग (पीजीटी) सारख्या भ्रूण तपासणी पद्धतींसह, एकल भ्रूण हस्तांतरण मानक पद्धत बनली आहे, ज्यामुळे अनेक गर्भधारणेशी संबंधित जोखीम लक्षणीयरीत्या कमी होतात आणि सुरक्षित गर्भधारणा सुनिश्चित होते.

लोकारोग्य

**आयव्हीएफ घेणाऱ्या जोडप्यांना समुपदेशनाची आवश्यकता असते का?**

आयव्हीएफ घेणाऱ्या जोडप्यांना अफळ कार्यक्रमांशी संबंधित असलेल्या व्यापक समुपदेशन आणि समर्थन प्रणालींचा फायदा होतो. जीवनशैलीतील बदल, पौष्टिक मार्गदर्शन आणि भावनिक समर्थन संसाधनांबद्दलचे शिक्षण सुधारित माता आरोग्य आणि तयारीमध्ये लक्षणीय योगदान देते, गर्भधारणेच्या अनुभवांवर सकारात्मक परिणाम करते.

आयव्हीएफ आणि इतर सहाय्यक पुनरुत्पादक तंत्रज्ञान केवळ गर्भधारणेला सुलभ करण्यापलीकडे जातात. ते कठोर पूर्व-गर्भधारणा तपासणी, वेळेचे नियंत्रण, एकाधिक गर्भधारणे रोखणे आणि सघन वैद्यकीय देखरेख आणि समर्थनाद्वारे मातृत्वाच्या परिणामांमध्ये गहन, मूर्त सुधारणा देतात. जसजसे हे तंत्रज्ञान विकसित होत जाते तसतसे ते सुरक्षित आणि निरोगी गर्भधारणेचे आश्वासन देत राहतात, जोडप्यांना पालकत्वाचे स्वप्न साध्य करण्यासाठी सक्षम करतात. ■ ■ ■



## औषधी बेलाचे पान

आपल्याकडे आयुर्वेदिक औषधी वनस्पतींना अधिक महत्व आहे. यामध्ये अनेक वनस्पतींचा समावेश केला जातो. हिरडा, कोरफड, हळद अशा अनेक घटकांचा वापर अनेक आजार बरे करण्यासाठी होतो. यातीलच एक महत्वाच्या घटक म्हणजे बेलपान होय. बेलाचे अनेक औषधी फायदे आहेत, जे आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. बेलाची पाने रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त मानली जातात. यामध्ये रेचक गुणधर्म मोठ्या प्रमाणात आढळतात. जे पुरेसे इन्सुलिन तयार करण्यात मदत करतात. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. बद्धकोष्ठतेची समस्या असल्यास वेलाची पाने खावीत. बेलची पाने थोडे मीठ आणि मिरपूड चघळल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. बेल पोट साफ करण्याचे काम करते. यात रेचक गुणधर्म आहेत जे पाचन तंत्र मजबूत करतात. उन्हाळ्याच्या दिवसात अतिसार ही समस्या आता अधिकांश लोकांमध्ये दिसून येते. या परिस्थितीत उलट्या, हगवण, मळमळ वाटू लागते. बेलाच्या पाण्यात साखर मिसळून प्यायल्यास याचे लाभ दिसून येतात. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com



## हेक्साहेल्थची सर्जिकल केअरसाठी १२ दशलक्ष डॉलर्सची मालिका ए पूर्ण

एक आघाडीचा तंत्रज्ञान-सक्षम शस्त्रक्रिया काळजी प्लॅटफॉर्म, हेक्साहेल्थने त्यांची १२ दशलक्ष डॉलर्सची मालिका ए निधी फेरी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे.

या फेरीचे नेतृत्व ओरिओस व्हेंचर पार्टनर्स आणि ३वन४ कॅपिटल यांनी केले होते, ज्यामध्ये नवीन गुंतवणूकदार एन्झिया व्हेंचर आणि आयटीआय ग्रोथ अपॉर्च्युनिटीज फंड, विद्यमान समर्थक चिराटे व्हेंचर आणि ओमिड्यार नेटवर्क इंडिया यांचा सहभाग होता. या निधीमुळे संपूर्ण भारतात सर्जिकल केअर कशी दिली जाते आणि अनुभव कसा घेतला जातो हे पुन्हा आकार देण्याच्या हेक्साहेल्थच्या मोहिमेला गती मिळेल.

प्रमुख उपक्रमांमध्ये नवीन शस्त्रक्रिया विशेष क्षेत्रांमध्ये विस्तार करणे, संपूर्ण भारतातील अतिरिक्त भौगोलिक क्षेत्रात प्रवेश करणे, रुग्णसेवेला अधिक वैयक्तिकृत आणि वर्धित करण्यासाठी एआय-संचालित प्लॅटफॉर्म तयार करणे आणि नवोन्मेष आणि प्रभाव वाढविण्यासाठी वरिष्ठ नेतृत्व पथकाला बळकटी देणे यांचा समावेश आहे.

आजपर्यंत, हेक्साहेल्थने भारतातील प्रमुख शहरांमध्ये ३०,००० हून अधिक शस्त्रक्रियांची सुविधा दिली आहे, ज्यामुळे रुग्णांना केवळ प्रक्रियाच नव्हे तर करुणामय, शेवटपर्यंत काळजीद्वारे मनःशांती मिळते. केवळ आर्थिक वर्ष २५ मध्ये, हेक्साहेल्थने सुमारे १५,००० शस्त्रक्रियांची सुविधा दिली, ज्यांचे मूल्य अंदाजे १५० कोटी होते आणि सकारात्मक योगदान मार्जिन मिळवले, जे मजबूत युनिट अर्थशास्त्राचे संकेत देते.

कंपनी आता नवीन शहरांमध्ये विस्तार करत आहे, लाखो गरजू लोकांपर्यंत रुग्ण-प्रथम दृष्टिकोन पोहोचवत आहे. ■

# तेलंगणाच्या माघारीमुळे नक्षलवाद्यांचे फावले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

छत्तीसगडमध्ये सुरू असलेल्या नक्षलविरोधी मोहिमेतून तेलंगणा सरकारने अचानक माघार घेतली असून, त्यामुळे नक्षलवाद्यांना जंगलात पळून जाण्याची संधी मिळाली आहे. जनसंघर्ष समितीने या कारवाईवर टीका करत तेलंगणा सरकारवर देशाशी गद्दारी केल्याचा आरोप केला आहे.



जनसंघर्ष समितीचे अध्यक्ष दत्ता शिर्के यांनी सांगितले की, छत्तीसगडमधील करेगुट्टा येथील सुमारे 5 हजार फूट उंचीच्या डोंगरात ३ हजारांहून अधिक नक्षलवादी अडकले होते. त्यामध्ये खतरनाक नक्षलवादी हिडमा, देवा, दामोदर, आझाद व सुजाता यांचा देखील समावेश होता. सीआरपीएफ, छत्तीसगड पोलिस आणि तेलंगणाचे जवान यांनी नक्षलवाद्यांना चारही बाजूंनी घेरले होते. मात्र अचानक तेलंगणा पोलिसांनी माघार घेतल्यामुळे नक्षलवादी तेलंगणाच्या जंगलात पळून जाण्यात यशस्वी ठरले.

राजकीय दबावात कॉंग्रेसने देशाच्या सुरक्षेचा सौदा केला आहे. या मोठ्या कारवाईत काही जवान उष्माघाताने त्रस्त होऊन मागे हटले, तेव्हा या मोहिमेच्या तपशीलांची माहिती समोर आली. सध्या या मोहिमेत केवळ सीआरपीएफ व कोब्रा यूनिट कार्यरत आहे, तर तेलंगणा पोलिस सहभागी नाहीत, असे स्पष्ट वक्तव्य तेलंगणाच्या भद्राद्री कोत्तागुडेम जिल्ह्याचे एएसपी विक्रांत सिंह यांनी दिल्याचे शिर्केंनी सांगितले.

नक्षलविरोधी मोहिमेच्या विरोधात 3 स्तरांवर कटकारस्थान रचले गेले. मोठ्या संख्येने नक्षलवादी संपवले जातील अशी शक्यता लक्षात घेत तथाकथित मानवाधिकार कार्यकर्ते व बुद्धिजीवी सक्रिय झाले. बीआरएसने सूड उगवल्याचा आरोपशिर्के यांनी भारत राष्ट्र समितीवरही गंभीर आरोप केले आहेत. दिल्लीतील दारू घोटाळ्यात बीआरएस नेत्या के. कविता यांना अटक झाली होती.